# महाराष्ट्र विधानपरिषद

## तिसरे (पावसाळी) अधिवेशन, २०२०

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### अमरावती जिल्ह्यातील अनुसूचित जाती व नवबौध्द वस्तीचा विकास करण्याबाबत

**(१) १०३२४ (२९-०७-२०१५). श्री.हरिसिंग राठोड, ॲड.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती जिल्ह्यातील अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीचा विकास करणे योजनेंतर्गत पूर्ण करण्यात आलेल्या कामाचा अंतिम हप्ता त्वरीत प्रदान करण्याकरिता स्थानिक लोकप्रतिनिधींनी आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांना माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदन देण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू निवेदनावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे (०९-०३-२०२०) :** (१), (२) व (३) अनुसूचित जाती व नवबौध्द वस्तीचा विकास करणे योजनेंतर्गत, दिनांक ३१ डिसेंबर, २०१९ अखेर पूर्ण होतील अशा सर्व कामांच्या देयकांचे प्रदान सन २०१९-२०२० या

चालू वर्षातील उपलब्ध निधीतून करण्यास शासन पत्र दिनांक ९ सप्टेंबर, २०१९ अन्वये आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना परवानगी देण्यात आलेली आहे.

---

## राज्यातील शेतकऱ्यांना पीककर्ज देण्यासाठी सहकारी बँकांना निधी उपलब्ध करून देण्याबाबत

**(२) २२२२७ (१९-०८-२०१६). ॲड.रामहरी रुपनवर, डॉ.(श्रीमती) निलम गोऱ्हे :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाडा, विदर्भ व पश्चिम महाराष्ट्रातील ६ हजार गावात असलेला दुष्काळ तसेच जिल्हा सहकारी बँकांची खालावलेली आर्थिक स्थिती त्यामुळे नवीन पीक कर्जासाठी कोट्यवधी रुपयाच्या निधीचे कृषी पतधोरणाचे नियोजन करण्यासाठी जागतिक बँकेकडून सहा महिन्यात (ऑक्टोबर, २०१६ पर्यंत) पाच हजार कोटी रुपयांचे कर्ज राज्य शासनाला मिळणार असल्याचे मा.मुख्यमंत्री यांनी दिल्ली येथे दिनांक २४ एप्रिल, २०१६ रोजी घोषित केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कर्जाच्या रकमेतून कोणकोणत्या योजना राबविण्यात येणार आहेत,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (०८-११-२०१९) :** (१) नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सोलापूर जिल्हयातील बोगस डॉक्टरांवर कारवाई करण्याबाबत

**(३) २३९१० (०४-०१-२०१७). श्री.प्रशांत परिचारक :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्हयात ३०० हून अधिक बोगस डॉक्टर वैद्यकीय व्यवसायात कार्यरत असून त्यांच्यावर कारवाई करण्याचे आदेश जिल्हाधिकारी यांनी महापालिका, आरोग्य विभाग व नागरी भागात जिल्हा शल्यचिकित्सक व ग्रामीण भागात जिल्हा आरोग्य विभाग, जिल्हा परिषद यांना दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आदेशाचे पालन संथगतीने होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित बोगस डॉक्टरांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अमित विलासराव देशमुख (२०-०२-२०२०) :** (१) वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग, शासन निर्णय, दि.०७/०२/२००० नुसार सोलापूर जिल्ह्यातील बोगस वैद्यकीय व्यवसायीकांवर कारवाई करण्यात येत आहे.

(२) हे खरे नाही.

(३) ऑक्टोबर, २०१६ पर्यंत एकूण ४९ बोगस वैद्यकीय व्यवसायीकांवर पोलिसांकडे एफआयआर/गुन्हे दाखल झाले आहे व एकूण १९६ संशयित बोगस वैद्यकीय व्यवसायीकांविरुध्द पोलिसात तक्रार दाखल आहे.

तसेच सोलापूर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील एका वैद्यकीय व्यवसायीकावर न्यायालयात खटला दाखल करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मराठवाड्यातील चारा छावण्याचे प्रलंबित अनुदान देण्याबाबत

**(४) २५५२४ (३०-१२-२०१६). श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाड्यात चौथ्या वर्षी दुष्काळ असून गत वर्षाच्या चारा छावण्याचे रूपये १५० कोटी थकीत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जनावरांच्या चारा छावण्या सुरू करण्याची वेळ आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून गत वर्षाच्या चारा छावण्याचे रूपये १५० कोटी देण्याबाबत तसेच यावर्षी चारा छावण्या सुरू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विजय वडेट्टीवार (०४-०१-२०२०) :** (१) हे खरे नाही.

सन २०१५-२०१६ व सन २०१६-२०१७ या आर्थिक वर्षात चारा छावण्यांची देयके थकित नाहीत.

(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जलयुक्त शिवार योजनेची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी निधीचे नियोजन जिल्हा स्तरावर करण्याबाबत

**(५) २५८०८ (२०-०४-२०१७). श्री.गोपिकिशन बाजोरीया :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जिल्हा परिषदेला शासन निर्णयानुसार योजनांची तांत्रिक प्रशासकीय अधिकार प्रदान केलेले असताना संचालक स्तरावरुन संबंधित संचालकांची तांत्रिक मंजूरी घेण्याचे आदेश काढण्यात येतात, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्हा परिषदेतील क व ड गटातील कर्मचा-यांच्या सार्वत्रिक बदल्या करताना जिल्हा परिषद पदाधिकाऱ्यांना विश्वासात घेण्यात येत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, रूपये १५ लक्ष पर्यंतची कामे ग्रामपंचायतींना देताना विनिर्दिष्ट कामाशिवाय इतर योजनांची कामे संबंधित प्रशासकिय अधिकाऱ्यांना देण्याबाबत स्पष्ट निर्देश देण्यात आलेले नाहीत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, जिल्हा परिषदेतील गट ब अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्याचे अधिकार जिल्हा परिषदेला देण्यात येणार आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन जलयुक्त शिवार योजनेची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी ५० टक्के निधीचे नियोजन जिल्हा स्तरावर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. हसन मुश्रीफ (०९-०७-२०२०) :** (१) अंशत: खरे आहे.

या विभागाच्या दिनांक ०७ ऑक्टोबर, २०१७ च्या शासन निर्णयातील भाग-४ नुसार जिल्हा परिषदेच्या स्वउत्पन्नातून राबविण्यात येणाऱ्या विकास योजनांच्या तांत्रिक मान्यतेचे संपूर्ण अधिकार जिल्हा परिषदेस प्रदान करण्यात आले आहेत.

जिल्हा नियोजन मंडळ व शासनाच्या निधीतून राबविण्यात येणाऱ्या विकास योजनांसाठी तांत्रिक मंजूरी, विकास योजना ज्या प्रशासकीय विभागाकडून राबविण्यात येतात, त्या विभागाकडून प्राप्त करून घेणे आवश्यक आहे.

(२) हे खरे नाही.

ग्रामविकास विभागाच्या दिनांक १५ मे, २०१४ अन्वये जिल्हा परिषदेतील क व ड गटातील कर्मचाऱ्यांचे जिल्हांतर्गत बदल्यांचे धोरण निश्चित करण्यात आलेले आहे. तसेच शासन परिपत्रक दिनांक २९ सप्टेंबर, २०११ अन्वये जिल्हा परिषदेतील क व ड गटातील कर्मचाऱ्यांचे आंतर जिल्हा बदल्यांचे धोरण निश्चित करण्यात आलेले आहे. या धोरणांनुसार जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांच्या बदल्या करण्यात येतात. या बदल्या करण्याचे सर्वस्वी अधिकार मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना दिलेले आहेत. प्राथमिक शिक्षकांच्या जिल्हांतर्गत बदल्या ऑनलाईन पध्दतीने करण्याचा शासनाने धोरणात्मक निर्णय घेतलेला आहे.

(३) हे खरे नाही.

ग्रामविकास विभागाच्या दिनांक २५ मार्च, २०१५ च्या शासन निर्णयातील मुद्दा क्र.६ नुसार वेगवेगळया योजनांमधून ग्रामपंचायत क्षेत्रात कार्यान्वयीत करण्यात यावयाची अन्य सर्व कामे संबंधित प्रशासकीय विभाग ज्या कार्यान्वयीन एजन्सी/यंत्रणेमार्फत करुन घेऊ इच्छितो त्या कार्यान्वयीन एजन्सी/यंत्रणेमार्फत करु शकतील असे नमुद आहे.

(४) जिल्हा परिषदेतील सहाय्यक गट विकास अधिकारी, गट-ब या संवर्गातील अधिकाऱ्यांच्या बदल्यांचे अधिकार जिल्हा परिषदेला देण्यात येणार नसून या कार्यासनामार्फत दिनांक ४ फेब्रुवारी, २०१५ च्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र विकास सेवा, गट-ब संवर्गातील सर्वसाधारण बदल्यांचे अधिकार विभागीय आयुक्त यांना प्रत्यार्पित करण्यात आले आहेत.
(५) टंचाईमुक्त महाराष्ट्र २०१९ अंतर्गत राज्यात जलयुक्त शिवार अभियान दिनांक ५ डिसेंबर, २०१४ च्या शासन निर्णयान्वये राबविण्यात येत आहे. जलयुक्त शिवार अभियान कार्यक्रमासाठी जिल्हा वार्षीक योजनेतून व आमदार स्थानिक विकास निधीतून निधी उपलब्ध करून देण्याबाबत नियोजन विभागाने दि.११/०३/२०१४ रोजी शासन निर्णय निर्गमित केलेला आहे. प्रत सोबत जोडण्यात येत आहे व या अभियानांतर्गत सन २०१५-२०१६ मध्ये निवडलेला गावांकरिता रू.२००० कोटी व सन २०१६-२०१७ मध्ये निवडलेल्या गावांकरीता रू.६०० कोटी इतका विशेष निधी DPDC मार्फत उपलब्ध करुन दिलेला असून आता या योजनेकरीता जलसंधारण विभागात नविन लेखा शिर्ष उघडण्यात आले असुन विशेष निधीची तरतुद या विभागात करण्यात येत आहे.

---

## खालापूर-कर्जत (जि.रायगड) तालुक्यातील शेतकऱ्यांच्या जमिनी बेकायदेशीर अधिग्रहण केल्याबाबत

**(६) २६६१७ (०४-०१-२०१७). श्रीमती विद्या चव्हाण :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खालापूर-कर्जत (जि.रायगड) तालुक्यातील शेतकऱ्यांच्या लागवडी खालील जमिनी बेकायदेशीरपणे खाजगी उद्योगांसाठी अधिग्रहण करण्याचा प्रयत्न उपजिल्हाधिकारी, रायगड यांनी दिनांक ११ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्यासुमारास केल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दिनांक ३१ ऑगस्ट, २०१६ रोजी सर्वोच्च न्यायालयाने पश्चिम बंगाल राज्यातील सिंगुर येथील शेतकऱ्यांच्या लागवडी खालील जमिनी, खाजगी उद्योगांसाठी शासनाला अधिग्रहित करणे घटनाबाह्य ठरवण्याचा

निर्णय दिला, याची नोंद उद्योग खात्याने खालापूर-कर्जत तालुक्यातील जमिनी अधिग्रहित करण्याच्या निर्णय घेतला आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (०९-०३-२०२०) :** (१) हे खरे नाही.

खालापूर औद्योगिक क्षेत्र टप्पा क्र.२ मध्ये खालापूर-कर्जत (जि.रायगड) तालुक्यातील जमिनी संपादन करण्याबाबतची अधिसूचना असाधारण भाग ४ ब मध्ये दि.२३/०९/२०१५ मध्ये प्रसिध्द करण्यात आली आहे. खालापूर टप्पा क्र.२ साठी होणारे भूसंपादन हे शेतकऱ्यांच्या संमतीने होणार असून, शेतकऱ्यांबरोबर वाटाघाटीने दर ठरवले जाणार होते. जमिनीचे दर ठरविण्याकरीता उपविभागीय अधिकारी व प्रादेशिक अधिकारी यांनी दि.०५/०४/२०१६ रोजी खालापूर येथील तहसील कार्यालयात आयोजित केलेल्या बैठकीत तसेच दि.२६/१०/२०१७ रोजी जिल्हाधिकारी रायगड यांच्या अध्यक्षतेखालील बैठकीत शेतकरी व शेतकरी प्रतिनिधी यांनी भूसंपादनास विरोध दर्शविला होता. उक्त क्षेत्रामध्ये ९४ टक्के भूधारकांचा विरोध असल्यामुळे उच्चाधिकार समितीने सदर क्षेत्र विनाअधिसूचित करण्याचा तत्वत: निर्णय घेतला आहे. उपविभागीय अधिकारी, कर्जत यांचेकडून जमीन विनाअधिसूचित करण्याबाबतचा प्रस्ताव तयार करण्याचे काम सुरू आहे. त्यामुळे जमीन अधिग्रहणाचा प्रश्न उद्भवत नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील रस्त्याच्या कामांना प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत मंजूरी न मिळाल्याबाबत

**(७) २९२२९ (२०-०५-२०१२). डॉ. रणजित पाटील :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत १० व्या टप्प्यासाठी राज्यातील ५,७०० कोटी रुपयांच्या नवीन कामांचे प्रस्ताव दिनांक २३ जून, २०१० पासून मा.केंद्रीय बांधकाम मंत्री महोदयांकडे प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, १० व्या टप्प्यातील कामातून राज्यभरात २५ मीटर पेक्षा जास्त लांबीचे पूल बांधले जाणार असून या टप्प्याला मंजूरी न मिळाल्यास ही कामे ठप्प होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रस्तावांना मंजूरी मिळण्याबाबत राज्य शासनाने केंद्रीय बांधकाम मंत्र्यांकडे पाठपुरावा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रिफ (०६-०२-२०२०) :** (१) हे खरे नाही. सन २०१० या वर्षात राज्याने प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत रस्ता दर्जोन्नती तसेच २५ मी. पेक्षा जास्त लांबीचे पूल बांधणीचे प्रस्ताव सादर केले होते व सप्टेंबर, २०१२ या वर्षात १३१ रस्ते व ६०९ पूल रुपये ९९९ कोटी तसेच ऑक्टोबर, २०१३ या वर्षात १०१ रस्ते व २९ पूल रुपये ३४९ कोटी असे एकूण २३२ रस्ते व ६३८ पुलांच्या रुपये १३४८ कोटीच्या कामांना मंजूरी मिळालेली आहे. त्यापैकी २०४ रस्ते व ६१० पुलांची कामे पूर्ण असून उर्वरीत कामे प्रगतीपथावर आहेत.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात निधीअभावी मनरेगा योजनेतील काम प्रलंबित असल्याबाबत

**(८) ३२२७५ (१८-०८-२०१७). श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात २१ जिल्हे दुष्काळग्रस्त असून तेथील ६ हजार ३५२ गावात मनरेगा योजनेंतर्गत एकही काम करण्यात आले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात निधीअभावी मनरेगा योजनेतून रोजगार देण्याचे काम प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मनरेगा योजनेचे पुनरुज्जीवन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे (१४-०३-२०२०) :** (१) हे खरे नाही.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (मनरेगा) ही काम मागणी आधारित योजना असून वर्ष २०१७-२०१८ साठी ८.०० कोटी मनुष्यदिवस निर्मितीचे लेबर बजेट केंद्र शासनाने मंजूर केलेले आहे. MIS Report नुसार सप्टेंबर, २०१७ अखेर महाराष्ट्रातील २८,७२८ ग्रामपंचायतींपैकी २३,६२४ ग्रामपंचायतींमध्ये वर्ष २०१७-२०१८ मध्ये मनुष्यदिवस निर्मिती झालेली आहे.
(२) हे खरे नाही. लेबर बजेट मंजूर करताना प्रत्येक ग्रामपंचायतीचा विचार करण्यात आला आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## विदर्भात मत्स्य उद्योग निर्मितीकरीता नवे मत्स्य धोरण तयार करण्याबाबत

**(९) ३२७८९ (०७-०८-२०१७). प्रा.जोगेन्द्र कवाडे** : सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विदर्भात मत्स्य उद्योगाला चालना देणे शक्य असून नैसर्गिक मत्स्य निर्मितीला गतिमान करण्यासाठी नवे मत्स्य धोरण तयार करणार असल्याचे मा.मत्स्यव्यवसाय मंत्री यांनी चंद्रपूर जिल्ह्याच्या दौऱ्यावर असतांना माहे जून, २०१७ मध्ये त्यादरम्यान जाहिर केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अस्लम शेख (२८-०२-२०२०) :** (१) होय.
(२) मत्स्यव्यवसायाकरीता जलाशय/तलाव ठेक्याने देण्यासाठी सुधारीत तलाव ठेका धोरण दिनांक ३ जुलै, २०१९ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात वैद्यकीय सेवेचे नियमन करण्यासाठी केंद्र शासनाने “नॅशनल मेडिकल कमिशन” (एनएमसी) हे विधेयक लागू केल्याबाबत

**(१०) ३८५९७ (०४-०४-२०१८). श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्रीमती हुस्नबानू खलिफे, ॲड.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील, डॉ.सुधीर तांबे, आर्कि.अनंत गाडगीळ :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात वैद्यकीय सेवेचे नियमन करण्यासाठी “मेडिकल काऊंसिल ऑफ इंडिया” (एमसीआय) या वैधानिक परिषदेऐवजी केंद्र शासनाने “नॅशनल मेडिकल कमिशन” (एनएमसी) हे विधेयक लागू करणार असल्याने याविरोधात सर्व डॉक्टरांनी दिनांक २ जानेवारी, २०१८ रोजी काळा दिवस पाळला असल्याची माहिती पुणे इंडियन मेडिकल असोसिएशन (आयएमए) ने दिली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, डॉक्टरांच्या म्हणण्यानुसार एनएमसी विधेयकाचा मसुदा रुग्णांच्या आणि लोकशाहीच्याही विरोधात असल्याने त्यांनी देशपातळीवरील शिखर संघटना “इंडियन मेडिकल असोसिएशन”ने देशव्यापी संपावर जाण्याचा निर्णय घेतला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. अमित विलासराव देशमुख (२८-०२-२०२०) :** (१) याबाबतची माहिती संबंधीत संस्थेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द झाली आहे.

(२) याबाबतची अधिकृत माहिती शासनास प्राप्त झाली नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील शहराचे नियोजन करताना मोकळ्या जागांचे प्रमाण लोकसंख्येच्या प्रमाणात धोरण निश्चित करण्याबाबत

**(११) ३८९४२ (१६-०५-२०१३). श्री.रामदास कदम :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोणत्याही शहराचे नियोजन करताना मोकळ्या जागांचे प्रमाण लोकसंख्येच्या प्रमाणात निश्चित करण्याचे धोरण आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईच्या १९९१ च्या विकास आराखड्यात ३ चौ.मी. प्रति व्यक्ती एवढी मोकळी जागा आली होती परंतु आता ती जेमतेम ०.९७ चौ.मी. झाल्याचे स्पष्ट झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच महाराष्ट्र वेटलँड ॲटलासनुसार खारफूटीची ५७१६ हेक्टर एवढीच जागा शिल्लक आहे व मिठागारांची १५७७ हेक्टर जागा नकाशात दाखविण्यात आली असून ती कमी होऊन ६४५ हेक्टर जागा एवढी शिल्लक राहिली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार कोणता निर्णय घेण्यात आला,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२८-०१-२०२०) :** (१) होय.

(२) बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्राच्या सन १९९१ मध्ये मंजूर सुधारित विकास आराखड्यामध्ये मोकळ्या जागांकरीता मुंबई शहरासाठी २.० चौ.मी. प्रति व्यक्ती इतके मानक निश्चित करण्यात आलेले होते तसेच मुंबई उपनगरासाठी एकूण ६ चौ.मी. प्रति व्यक्ती इतके मानक निश्चित करण्यात आलेले होते.

बृहन्मुंबई महानगरपालकेच्या हद्दीच्या तयार करण्यात आलेल्या विद्‌यमान भूवापर नकाशा (२०१२) मध्ये खेळाचे मैदान, उद्‌यान, मनोरंजन

मैदान व उपवन अशा मोकळ्या जागेखालील क्षेत्र ०.९७ चौ.मी. प्रति व्यक्ती नसून ते महानगरपालिका क्षेत्रातील विशेष नियोजन प्राधिकरणाचे क्षेत्र विचारात घेवून मोकळ्या जागेचे क्षेत्र १.९१ चौ.मी. प्रति व्यक्ती इतके आहे. तर बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजना-२०३४ मध्ये अशा मोकळ्या जागेचे खेत्र ४ चौ.मी. प्रति व्यक्ती इतके मानक विचारात घेण्यात आल आहे.

(३) राष्ट्रीय पाणथळ नकाशामध्ये नमूद केल्याप्रमाणे मुंबई शहर व उपनगरामधील खारफूटींचे क्षेत्र हे ५७१६.०० हेक्टर इतके आहे. मुंबई महानगरपालिकेच्या विद्यमान भूवापर नकाशातील खारफूटीचे क्षेत्र, विशेष नियोजन प्राधिकरणामधील खारफूटीचे क्षेत्र व जी.आय.एस. प्रणालीनुसार (महानगरपालिका क्षेत्राधिकारामधील तसेच क्षेत्राधिकाराबाहेरील) क्षेत्र हे ६२९३.४० हेक्टर इतके आहे. त्यामुळे बृहन्मुंबईमधील खारफूटीच्या क्षेत्रामध्ये कोणतीही कमतरता नाही असे दिसून येते. राष्ट्रीय पाणथळ नकाशानुसार मुंबई शहर व उपनगरातील सॉल्टपॅन लँड (व्यावसायीक वापराकरीता) खालील क्षेत्रफळ ९२३.०० हेक्टर इतके आहे.

विद्यमान भूवापर नकाशा (२०१२) नुसार सॉल्टपॅन लँडखालील विशेषत: मीठ निर्मिती उत्पादनाकरीता वापरात असलेले बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीतील क्षेत्रफळ ६५०.० हेक्टर इतके आहे व मुंबई महानगरपालिकेच्या सार्वजनिक सुविधांकरीता वापरात असलेली सॉल्टपॅन जमिनीमधील क्षेत्र ३५७.०० हेक्टर असे एकूण क्षेत्रफळ १००७.५० हेक्टर इतके भरते सबब, राष्ट्रीय पाणथळ नकाशानुसार नमूद केलेल्या सॉल्टपॅन जमिनी क्षेत्रामध्ये कोणतीही कमतरता दिसून येत नाही.

(४) उक्त खारफूटीचे व मिठागराचे उचित क्षेत्र विकास योजना-२०३४ मध्ये दर्शविण्यात आले असल्याने चौकशी करण्याची आवश्यकता नाही.

(५) लागू नाही.

---

## अनुसूचित जाती व नवबौध्द समाजाच्या वस्त्यांना पायाभूत सुविधा पुरविण्याबाबत

**(१२) ३९०५१ (०५-०४-२०१८). श्री.बाळाराम पाटील :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सामाजिक न्याय विभागातर्फे अनुसूचित जाती व नवबौध्द समाजाच्या वस्त्यांना पायाभूत सुविधा पुरविण्यासाठी शासनाकडून "भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजनेंतर्गत" जिल्हा नियोजन समितीला रुपये ७०० ते ७५० कोटी इतकी रक्कम प्रतिवर्षी दिली जाते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संपूर्ण राज्यात प्रत्येक जिल्हा नियोजन समितीच्या वाट्याला येणारा निधी वस्त्यांमधील कोणत्या पायाभूत सुविधांसाठी खर्च करण्यात येतो याची माहिती घेणे तसेच सदर निधी कमी पडत असल्याने त्यात रुपये १०० कोटी इतकी वाढ करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पायाभूत सुविधा सुचविण्यासाठीच्या निकषामध्ये बदल करण्यासंदर्भात लोकप्रतिनिधी, जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य व नगरपालिका सदस्य यांच्या सूचनांचाही समावेश करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, प्रत्येक जिल्हा नियोजन समितीला प्राप्त निधी, करण्यात येणारी कामे व त्या कामांच्या खर्चावर अंकुश ठेवण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. धनंजय मुंडे (०९-०३-२०२०) :** (१) नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील विमा रुग्णालयांची दुरवस्था झाल्याबाबत

**(१३) ३९२८० (०४-०४-२०१८). प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार, श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने कामगारांच्या आणि त्यांच्या कुटुंबियांच्या आरोग्याकरिता विमा रुग्णालयाची स्थापना केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विमा रुग्णालयांमध्ये रुग्णांवर उपचार करण्यासाठी लागणाऱ्या सोयी व सुविधांचा अभाव असल्याचे तसेच रुग्णालयांची दूरवस्था झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विमा रुग्णालयात वैद्यकीय चाचण्या करण्यासाठी डॉक्टर, नर्स व इतर अधिकाऱ्यांची संख्या किती आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे (१५-०२-२०२०) :** (१) हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

तथापि, सदर योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्य शासनाने महाराष्ट्र राज्य कामगार विमा सोसायटी स्थापन केली असुन सदर सोसायटीस पुरेशा निधी हा राज्य कामगार विमा महामंडळ, नवी दिल्ली यांच्याकडून थेट प्राप्त होणार आहे. सदर सोसायटीमार्फत राज्य कामगार विमा योजनेंतर्गत पुरविण्यात येणाऱ्या सेवा व सुविधांमध्ये सुधारणा करण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) सद्यस्थितीत राकावि योजनेत ३६ विशेषज्ञ, २२२ वैद्यकीय अधिकारी गट (अ), ९ निवासी विशेषज्ञ, २६१ समवैद्यकीय, ६३९ परिचारीका यांची पदे भरलेली आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

# शेंद्रा-बिडकीन (जि.औरंगाबाद) येथील दिल्ली-मुंबई इंडस्ट्रीअल कॅरीडॉर प्रकल्पाबाबत

**(१४) ४११६५ (०५-०५-२०१८). डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिल्ली-मुंबई इंडस्ट्रीअल कॅरीडॉर अंतर्गत औरंगाबाद जिल्हयातील शेंद्रा-बिडकीन येथे विकसित होत असलेल्या औद्योगिक शहरामध्ये ३२० अब्ज रुपयांची गुंतवणूक होणे अपेक्षित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकल्पाची सद्यस्थिती काय आहे तसेच सदर प्रकल्पात परदेशी गुंतवणूक होण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (२८-०२-२०२०) :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) शेंद्रा येथील विविध क्षेत्रफळांचे ४९ भूखंड वाटप करण्यात आलेले आहेत. ज्यामध्ये Hyosung India Private Ltd व Oerlicon Balzers Coating India Private Ltd. या परदेशी कंपन्यांचा समावेश आहे.

Hyosung India Private Ltd हा दिल्ली-मुंबई इंडस्ट्रीयल कॉरीडॉर अंतर्गत देशातील पहिला अँकर प्रकल्प शेंद्रा येथे आला आहे.

इतर परदेशी कंपन्यांना आकर्षित करण्यासाठी Make in India in Maharashtra यासारख्या कार्यक्रमात एआयटीएलने सहभाग नोंदविलेला आहे. तसेच विविध रोडशोज व B२B मिटींगजचे आयोजन करुन Invest India या केंद्र शासनाच्या उपक्रमात एआयटीएल सक्रिय सहभाग नोंदवत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर (हिंगण) औद्योगिक परिसरात उद्योगांना भूखंड दिल्याबाबत

**(१५) ४१३३९ (०१-०८-२०१८). प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.प्रकाश गजभिये :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरामध्ये एमआयडीसी केव्हा सुरु झाली असुन किती जमीन एमआयडीसीसाठी अधिग्रहित करण्यात आली व किती उद्योग सुरु करण्यात आले,

(२) असल्यास, नागपूर (हिंगणा) औद्योगिक परिसरात एकंदर किती भूखंड आहेत यापैकी उद्योगांना किती भूखंड देण्यात आले व त्यावर किती उद्योग सुरु करण्यात आले व किती उद्योग बंद आहेत आणि रिक्त भूखंड किती असुन त्यांचे वाटप कसे आणि केव्हा करणार आहेत,

(३) असल्यास, एमआयडीसीमध्ये किती उद्योग बंद करण्यात आले व त्यामुळे किती नागरिक बेरोजगार झाले,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (०६-१२-२०१९) :** (१) नागपूर (हिंगणा) औद्योगिक क्षेत्र सन १९७० ला कार्यान्वित झालेले असून या क्षेत्राकरिता ७४५.९३ हे.आर. जागा संपादित केली आहे. या औद्योगिक क्षेत्रात १२९७ (लहान/मोठे) उद्योग कार्यान्वित आहेत.

(२) नागपूर (हिंगणा) औद्योगिक क्षेत्रात १६८५ भूखंड आरेखित करण्यात आलेले आहेत. या भूखंडापैकी १६४७ भूखंडाचे वाटप करण्यात आलेले असून १२९७ उद्योग कार्यान्वित आहेत. यापैकी २३० भूखंडावर उत्पादन बंद आहे. सर्व प्रकारचे ३४ भूखंड उपलब्ध आहेत. या भूखंडाचे वाटप निविदा पध्दतीने तसेच उद्योग विस्ताराकरिता प्राधान्याने वाटप करण्याचे धोरण आहे.

(३), (४) व (५) नागपूर (हिंगणा) एमआयडीसीमध्ये एकूण २३० उद्योग बंद आहेत. सदर उद्योग घटक सुरु असताना त्यामध्ये ३१९२ कामगार कार्यरत होते. उद्योग सुरु झाल्यानंतर उद्योग दिर्घकाळ चालावा याकरीता शासनाची

सामुहीक प्रोत्साहन योजना असून वेगवेगळ्या कालावधीकरीता ही योजना राबविण्यात आली आहे. त्यामध्ये वेगवेगळे अनुदान देण्यात आले असून सदर योजनेचा लाभ ४४ उद्योग घटकांना देण्यात आला आहे.

---

## विदर्भात रिफायनरी प्रकल्प सुरू करणेबाबत

**(१६) ४१४३६ (०१-०८-२०१८). श्री.हरिसिंग राठोड :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी येथे उभारण्यात येणारा नाणार प्रकल्प विदर्भात व्हावा अशी मागणी लोकप्रतिनिधीमार्फत करण्यात येत असल्याची बाब माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रिफायनरी हवी असेल तर विदर्भात समुद्र आणा मी रिफायनरी देतो असे विधान मा.मुख्यमंत्री यांनी महाराष्ट्र दिनाच्या कार्यक्रमात केले असुन समुद्र नसलेल्या देशातही रिफायनरी प्रकल्प सुरु आहे, या पार्श्वभूमीवर विदर्भात रिफायनरी प्रकल्प उभारण्यात येणार आहे काय,

(३) असल्यास, विदर्भातील बेरोजगारी प्रमाण लक्षात घेता येथे मोठा प्रकल्प शासन देणार काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (०६-१२-२०१९) :** (१) हे खरे आहे.

(२), (३), (४) व (५) पावसाळी अधिवेशन, २०१८ मध्ये मा.लोकप्रतिनिधी यांनी उपस्थित केलेल्या औचित्याच्या मुद्यांवर सभागृहात झालेल्या चर्चेत तेल समुद्राच्या मार्गे येत असल्याने कोस्टल रिफायनरीमध्ये वाहतुकीचा खर्च वाचतो. ही रिफायनरी इनलँड व एक्सपोर्ट दोन्हींसाठी आहे. तथापि विदर्भात रिफायनरी झाली पाहिजे यासाठी लोकप्रतिनिधींनी मागणी केली आहे. त्यामुळे इथे समुद्रकिनारा नसला तरी इनलँड रिफायनरी करता येऊ शकते. विदर्भामध्ये इनलँड रिफायनरी करण्यासाठी केंद्रास विनंती करण्यात येईल.

---

## राज्यातील मुख्य रस्ते, जिल्हा रस्ते व इतर रस्त्यांच्या दर्शनी ठिकाणी मार्गदर्शन सूचना फलक लावण्याबाबत

**(१७) ४२२०० (०२-०८-२०१८). श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्रादेशिक व केंद्रीय परिवहन विभाग, मुख्य रस्ते, जिल्हा रस्ते व इतर रस्त्यावर योग्य ठिकाणी मार्गदर्शक सूचना फलक लावत नसल्यामुळे अपघातांचे प्रमाण वाढत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मार्गदर्शक सूचना फलक रस्त्यावर नसल्यामुळे वाहनधारकांना अनेक समस्या बरोबरच पोलिसांच्या चौकशीचे तसेच परिवहन विभागाने लावलेल्या आर्थिक दंडाला सामोरे जावे लागत असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, केंद्र शासनाच्या मार्गदर्शन सूचना सर्व शासकीय व खाजगी रुग्णालयात अपघातग्रस्त दाखल केल्यास पैशांची मागणी न करता उपचार करणे बंधनकारक आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मुख्य रस्ते, जिल्हा रस्ते व इतर रस्त्यांच्या दर्शनी ठिकाणी मार्गदर्शन सूचना फलक लावण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण (१९-०३-२०२०) :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) अपघातग्रस्तांना रुग्णालयात दाखल केल्यास त्या संबंधातील औपचारीक पोलीस कारवाईसाठी प्रतिक्षा न करता रुग्णालयाने उपचार सुरु करावे असे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने रिट याचिका क्र.२७०/१९८८ मध्ये दि.२८/८/१९८९ रोजी दिले आहेत.

(४) सार्वजनिक बांधकाम विभागाच्या प्रमुख जिल्हा मार्ग व राष्ट्रीय महामार्गावर आवश्यक त्याठिकाणी सूचना फलक लावण्यात आले असून वेळोवेळी पुनश्च आवश्यकता बघून नवीन सूचना फलक लावण्यात

येतात. तसेच जुने फलक खराब झाले असल्यास देखभाल दुरुस्ती कामातूनही दुरुस्त केले जातात अथवा नवीन बसविण्यात येतात.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## माजलगांव (जि.बीड) येथील जिल्हा परिषद रमाई घरकुल योजनेसाठी गटविकास अधिकारी यांनी पैशांची मागणी केल्याबाबत

**(१८) ४२९७० (०२-०८-२०१८). श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) माजलगांव (जि.बीड) येथील जिल्हा परिषद मुलांच्या शाळेत “शिक्षणाची वारी” या तालुकास्तरीय कार्यक्रमाच्यावेळी रमाई घरकुल योजनेसाठी गटविकास अधिकारी पैसे मागत असल्याने श्रीमती अरुणा श्रीरंग वाघमारे यांनी बी.डी.ओ.च्या अंगावर हार भिरकावून सदर कार्यक्रमात दोन शिक्षकांनी दारु पिऊन गोंधळ घातला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (१९-०३-२०२०) :** (१) माजलगांव (जि.बीड) येथील जिल्हा परिषद मुलांच्या शाळेत “शिक्षणाची वारी” या तालुकास्तरीय कार्यक्रमाच्यावेळी रमाई घरकुल योजनेसाठी श्रीमती अरुणा श्रीरंग वाघमारे यांनी बी.डी.ओ.च्या अंगावर हार भिरकावला तसेच सदर कार्यक्रमात दोन शिक्षकांनी दारु पिऊन गोंधळ घातला, हे खरे आहे. तथापि, रमाई घरकुल योजनेसाठी पैशांची मागणी केली ही बाब खरी नाही.
(२) रमाई घरकुल योजनेंतर्गत लाभार्थ्यांची निवड ग्रामसभेत करणे व त्याचा प्रस्ताव संबंधीत ग्रामपंचायतीने पंचायत समितीकडे सादर करणे आवश्यक आहे. परंतू, श्रीमती अरूणा श्रीरंग वाघमारे यांनी संबंधीत प्रस्ताव ग्रामपंचायतीकडे सादर न करता पंचायत समितीकडे सादर केला. पंचायत

समिती कार्यालयाकडून सदर प्रस्ताव दि.३१/०३/२०१८ रोजीच्या पत्रान्वये सहायक आयुक्त, समाजकल्याण, बीड यांच्या कार्यालयास पाठविण्यात आला आहे.

शिक्षणाची वारी या कार्यक्रमामध्ये श्री. धस अरूण रंगनाथ, सह शिक्षक यांनी दारू पिऊन श्री. राऊत नवनाथ साधु, मुख्य अध्यापक यांचे सोबत भांडण करून कार्यक्रमामध्ये गोंधळ घातल्यामुळे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांच्या दि.२३/०४/२०१८ च्या आदेशान्वये श्री.धस यांना निलंबित करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चांदोली अभयारण्य, कोयना, गडनदी, जामदा प्रकल्पग्रस्तांच्या मागण्यांबाबत

**(१९) ४६५२९ (०५-०७-२०१९). श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.आनंदराव पाटील, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अनिकेत तटकरे, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.ख्वाजा बेग, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्ह्यातील चांदोली अभयारण्य, कोयना, गडनदी, जामदा इत्यादी प्रकल्पग्रस्तांनी रत्नागिरी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर दिनांक ४ एप्रिल, २०१९ पासून आंदोलन सुरु केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकल्पग्रस्तांच्या मागण्यांचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन प्रकल्पग्रस्तांच्या मागण्यांबाबत निर्णय घेऊन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड (१७-०२-२०२०) :** (१) व (२) रत्नागिरी जिल्ह्यातील प्रकल्पस्तांनी दिनांक ०२/०२/२०१९ ते दिनांक २६/०३/२०१९ या कालावधीत खालील मागण्यांकरीता जिल्हाधिकारी, रत्नागिरी कार्यालयासमोर आंदोलन केल्याची घटना निदर्शनास आली आहे.

- पुनर्वसन शाखेतील रिक्त पदे भरणे.
- पुनर्वसन आराखड्यानुसार संकलन रजिस्टर तयार करणे.
- भूसंपादन करतांना खातेदारांसमोर संयुक्त मोजणी करणे.
- झाडे, नाले, गटारे यांची खात्री करुन नोंद करणे.
- मोबदला वाटप करताना शासकीय पुनर्वसन अथवा स्वेच्छा पुनर्वसन पाहिजे असल्यास त्याबाबत लेखी जबाब घेणे.
- कुटुंबसंख्येप्रमाणे भूखंडाचे वाटप करणे.
- गावठाणांचे हस्तांतरण जिल्हा परिषदेकडे करणे.
- गावठाणामध्ये ग्रामपंचायत स्थापन करणे.
- शेतजमिनीसाठी ६५% रक्कम भरुन घेणे.
- १०% वाढीव भूखंड ठेवणे.
- कोयना प्रकल्पग्रस्तांना जमिनी देणे.
- प्रकल्पग्रस्तांना नोकरी देणे.
- शेतकऱ्यांना लाभ क्षेत्रामध्ये एक एकर शेतजमीन उपलब्ध करुन देणे.
- नागरी सुविधा पुरविणे.

(३) व (४) जिल्हाधिकारी, रत्नागिरी कार्यालयसमोर आंदोनलकर्त्यांच्या मागण्यांवर खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे :-

- पुनर्वसन शाखेतील रिक्त पदे भरण्यात आली आहेत.
- रत्नागिरी जिल्हयामध्ये एकूण २६ प्रकल्प असून त्यापैकी ७ प्रकल्प स्वेच्छा पुनर्वसन घेतलेले आहे व ४ प्रकल्पात एकही कुटुंब बाधित होत नसलेले प्रकल्प आहेत.  उर्वरीत १५ प्रकल्पांमध्ये संकलन रजिस्टर तयार करण्याची कार्यवाही सुरू आहे.
- भूसंपादन प्रकरणातील संयुक्त मोजणी करताना उपअधीक्षक भूमि अभिलेख यांचे कार्यालयाकडून मोजणी संदर्भात तारीख व वेळ निश्चित करुन तसेच ७/१२ वरील सर्व खातेदारांना त्याबाबत नोटीसा काढण्यात येऊन त्यांच्या उपस्थितीत मोजणी केली जाते व संबंधित जमिनीमध्ये आढळलेले बांधकाम, झाडे, फळझाडे, विहिरीच्या नोंदी घेतल्या जातात.
- स्वेच्छा पुनर्वसन पाहिजे असल्यास त्याबाबत लेखी जबाब घेण्यात येतात. त्यानुसारच मोबदला वाटपाची कार्यवाही करण्यात येते.

- पुनर्वसन अधिनियमातील तरतुदीनुसार कुटुंबातील व्यक्तीची संख्या विचारात घेऊन भूखंडाचे वाटप करण्यात येते.
- ज्या गावठाणातील नागरी सुविधांची कामे पूर्ण झाली आहे ती गावठाणे जिल्हा परिषदेकडे हस्तांतरण करणेत आली आहेत.
- लोकसंख्येनुसार पुनर्वसित गावठाणांचे महसूल गावात रुपांतर झाल्यानंतर ग्रामपंचायत स्थापन करण्याची कार्यवाही करण्यात येते.
- वाढीव भूखंड देण्याच्या अनुषंगाने प्रचलित शासन निर्णयातील तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात येते.
- शेतजमिनीसाठी ६५% रक्कम भरुन पर्यायी शेतजमीन देण्याच्या अनुषंगाने प्रचलित नियमानुसार कार्यवाही करण्यात येत आहे.
- रत्नागिरी जिल्हयामधील उपलब्ध जमिनीच्या अनुषंगाने कोयना प्रकल्पातील ८७ प्रकल्पग्रस्तांना जमिनीचे वाटप करण्यात आले आहे. त्याव्यतिरीक्त शिल्लक प्रकल्पग्रस्तांना पर्यायी शेतजमिनी उपलब्ध नसल्याने वाटप करण्यात आलेले नाही.
- प्रकल्पग्रस्तांची नौकरीकरीता नियुक्ती जाहिरातीव्दारे स्पर्धापरिक्षा घेवून करण्यात येते.
- लाभ क्षेत्रामध्ये शेतकऱ्यांना जमीन देण्याबाबत प्रचलित अधिनियमातील तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात येते.
- शासन नियमानुसार देय असलेल्या नागरी सुविधा पुरविणेबाबत कार्यवाही करण्यात येते.

---

## रायगड जिल्हयातील आदिवासी वाड्यांमध्ये मुख्य रस्त्याला जोडणारे रस्ते नसल्याबाबत

**(२०) ४६५७३ (०६-०७-२०१९). श्री.जयंत पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक ३८६६९ ला दिनांक ५ मार्च, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्हयातील आदिवासी वाड्या वस्त्यांमध्ये आदिवासी ठाकूर समाज स्वातंत्र्यपूर्व काळापासून वास्तव्य करीत असून सदरहू समाज पायाभूत सोयी सुविधांपासून वंचित राहिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रायगड जिल्हयाच्या दुर्गम भागातील टिएसपी अंतर्गत गावाशी जोडणाऱ्या रस्त्यांबद्दल जिल्हा नियोजन समितीमध्ये प्राधान्य देणेकरीता देण्यात आलेल्या सूचनानुसार कोणकोणत्या रस्त्यांची कामे करण्यात आली, तसेच जिल्ह्यातील इतर तालुक्यासह अलिबाग तालुक्यातील ३६ आदिवासी वाड्यांमध्ये मुख्य रस्त्यांपर्यंत पोहोच रस्ते नसल्यामुळे येथे कोणतेही वाहन येत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आदिवासी वाड्या वस्त्या मुख्य रस्त्यापासून ४ ते ५ किलोमीटर पेक्षा जास्त अंतरावर असल्यामुळे विद्यार्थ्यांना, रूग्णांना तसेच नियमित कामकाजासाठी येथील ग्रामस्थांना रोज पायपीट करावी लागते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार आदिवासी वाड्या वस्त्यांमध्ये तसेच बिगर आदिवासी क्षेत्रातून मुख्य रस्त्याला जोडणारे पोहोच रस्ते तयार करण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. के.सी.पाडवी (१३-०२-२०२०) :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्यातील ४७ गावे अतिरिक्त आदिवासी उपयोजना क्षेत्रात आहेत. सन २०१८-२०१९ मध्ये एकूण ४७, सन २०१९-२०२० मध्ये एकूण २ अशी ४९ कामे मंजूर करण्यात आलेली आहे. रायगड जिल्ह्यातील ६ तालुक्यातील १३४ गावे वगळता इतर तालुके हे आदिवासी उपयोजना बाह्य क्षेत्रामधील असल्याने सदर तालुक्यामध्ये प्रचलित नियमानुसार सामुहिक स्वरुपाची कामे जिल्हा वार्षिक आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत करता येत नाहीत. ठक्कर बाप्पा सुधार योजना तसेच केंद्रवर्ती अर्थसंकल्प योजनेतून सामुहिक व वैयक्तिक योजनांचा लाभ अलिबाग तालुक्यातील आदिवासी वाड्या वस्त्यांमधील लाभधारकांना देण्यात येतात.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ग्रामरोजगार सेवकांचे प्रश्न प्रलंबित असल्याबाबत

**(२१) ४६६७० (०५-०७-२०१९). श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात १२ वर्षापासून ग्रामरोजगार सेवकांचे अनेक प्रश्न प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ग्रामरोजगार सेवकांचे कोणकोणते प्रश्न प्रलंबित आहेत व ते सोडविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे (०४-०३-२०२०) :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) व (३) ग्रामरोजगार सेवकांच्या मानधनात वाढ करण्याबाबतच्या मागणी संदर्भात राज्य निधी असोसिएशनच्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयानुसार ग्रामरोजगार सेवकांनी किमान ४०० पेक्षा अधिक मनुष्यदिवस निर्मिती केल्यास रु.४०००/- किमान १४०० पेक्षा अधिक मनुष्यदिवस निर्मिती केल्यास रु.६०००/- व किमान २४०० पेक्षा अधिक मनुष्यदिवस निर्मिती केल्यास रु.८०००/- इतकी रक्कम प्रचलित मानधनाव्यतिरिक्त वार्षिक वाढीव प्रोत्साहन रक्कम म्हणून देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच त्यांना पूर्णवेळ घेण्याबाबत केलेली मागणी मान्य करता येणार नाही कारण ग्रामरोजगार सेवकांचे काम हे अर्धवेळ स्वरुपाचे असून त्यांना उत्पन्नाचे अन्य मार्ग उपलब्ध असल्यास ते करण्याची मुभा देण्यात आलेली आहे.

---

## आर्णी (जि.यवतमाळ) येथे पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-१ चे रुपांतर तालुका लघु पशुचिकित्सालयामध्ये करण्याबाबत

**(२२) ४६७११ (०५-०७-२०१९). श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, श्री.आनंद ठाकूर : तारांकित प्रश्न क्रमांक २८४६२ ला दिनांक १० मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आर्णी (जि.यवतमाळ) येथे पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-१ चे रुपांतर तालुका लघु पशुचिकित्सालयामध्ये करण्यात यावे अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी निवेदनाव्दारे शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जा.क्र.मंत्री/पदुम/व्हीआयपी/८२/२०१६ नुसार उचित कार्यवाहीकरीता सदर निवेदन विभागास पाठविण्यात आले असून सदर निवेदनावर कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त धोरणात्मक बाबी प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुनिल केदार (२४-०१-२०२०) :** (१), (२) व (३) अशा स्वरुपाची मागणी लोकप्रतिनिधींकडून शासनाकडे करण्यात आली असून त्यानुषंगाने आर्णी (जि.यवतमाळ) येथे पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-१ चे रुपांतर तालुका लघु पशु सर्वचिकित्सालयामध्ये करणेबाबतचा परिपूर्ण प्रस्ताव शासनास सादर करण्याच्या अनुषंगाने आवश्यक कार्यवाही आयुक्त पशुसंवर्धन स्तरावर सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुस्लीम मेहतर समाजास लाड-पागे समितीच्या शिफारशी लागू करण्याबाबत

**(२३) ४६७२७ (०६-०७-२०१९). श्री.अनिकेत तटकरे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.ख्वाजा बेग, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.किरण पावसकर : दिनांक २२ नोव्हेंबर, २०१८ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ४ मधील प्रश्न क्रमांक ४०३८२ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मुस्लीम मेहतर समाजास लाड-पागे समितीच्या शिफारशीपासून वंचित ठेवण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनस्तरावर वारंवार बैठका होऊन सुध्दा याबाबतचा निर्णय शासनस्तरावरुन झालेला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, लाड-पागे समितीच्या शिफारशीनुसार राज्यातील अनेक सफाई कामगारांच्या पाल्यांना नियुक्त्या देण्यात आल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन लाड-पागे समितीच्या शिफारशींची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीकोनातून कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे (१२-०३-२०२०) :** (१) नाही.
(२), (३) व (४) या विभागाच्या दिनांक २५/६/२००८ रोजीच्या शासन निर्णयान्वये मुस्लीम-मेहतर/लालबेग/हलालखोर/खाकरोब या जाती विशेष मागास प्रवर्गात समाविष्ट केल्या आहेत. सबब, मुस्लीम मेहतरमध्ये मुस्लीम धर्माचा संबंध येत असल्यामुळे त्यांना अनुसूचित जातीचा लाभ देता येत नाही. मात्र दिनांक २५/६/२००८ पूर्वी जे सेवेत लागले आहेत त्यांच्या सेवा संरक्षित करण्याबाबत व विविध विभागांनी सफाई कामगारांच्या वारसा हक्काबाबत यापूर्वी निर्गमित केलेल्या शासन निर्णयांचे एकत्रिकरण करुन सर्वसमावेशक बाबींचा शासन निर्णय निर्गमित करण्याचा प्रस्ताव विचाराधीन आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## लोकमान्य टिळक रुग्णालय, मुंबई हे संसर्गग्रस्त असल्याबाबत

**(२४) ४६९११ (१२-०७-२०१९). श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लोकमान्य टिळक रुग्णालय, मुंबई येथे संसर्गग्रस्त असल्याची धक्कादायक बाब माहे मार्च, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान एका माहितीच्या अधिकारामध्ये स्पष्ट झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार सदर रुग्णालय संसर्गविरहित करण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उध्दव ठाकरे (०७-१२-२०१९) :** (१) व (२) हे खरे नाही.

सदर रुग्णालय संसर्गविरहित करण्याबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येते :-

- प्रत्येक शस्त्रक्रियागृहाचे सकाळी एकदा, प्रत्येक रुग्णाच्या शस्त्रक्रियेनंतर आणि दैनंदिन शस्त्रक्रिया संपल्यानंतर निर्जंतुकीकरण केले जाते.
- काही जंतुंची प्रमाणाबाहेरील वाढ, संशोधन, शस्त्रक्रियागृहाच्या वातावरणातील संभाव्य धोकादायक संसर्ग अथवा गुणवत्तेची खात्री करणे इत्यादी ठराविक कारणांसाठी सुक्ष्मजीवांच्या वाढीची तपासणी केली जाते.
- अशा तपासणी दरम्यान शस्त्रक्रियेचे टेबल, स्पॉट लाईट, ॲनास्थेशिया ट्रॉली तसेच शस्त्रक्रियागृहातील नळांच्या तोट्या या ठिकाणांवरुन नमुने घेऊन सुक्ष्मजीवांच्या वाढीची तपासणी केली जाते.
- रुग्ण या ठिकाणांच्या संपर्कात येत नाहीत, तरीही अशा ठिकाणी वाढ आढळल्यास रुग्णाच्या सुरक्षेच्या दृष्टीने व संसर्गाच्या प्रतिबंधासाठी त्यांचे निर्जंतुकीकरण केले जाते.
- मागील पाच वर्षांत सदर रुग्णालयात २७,९६३ सर्वेक्षणात्मक नमुने घेण्यात आले असून, ७५५ ठिकाणी (२.७%) जंतुंची वाढ झाल्याचे आढळून आले. सदर प्रमाण हे राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय प्रमाणाशी सुसंगत आहे.

तथापि, श्री. चेतन कोठारी यांना माहितीच्या आधारे उपलब्ध करुन देण्यात माहितीचा चुकीचा अन्वयार्थ लावण्यात आल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

## मुंबई येथील सहकारी संस्थांचे लेखापरिक्षण करण्याबाबत

**(२५) ४६९३५ (०६-०७-२०१९). डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील ९ हजाराहून अधिक सहकारी संस्थांनी सन २०१७-१८ वर्षातील कारभाराचे लेखापरिक्षण केले नसल्याची बाब माहे मार्च, २०१९ च्या प्रथम सप्ताहात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अशा किती संस्थांनी आपले लेखापरिक्षण सहकार विभागाला सादर केले आहेत व किती संस्थांनी लेखापरिक्षण सादर केले नाहीत, तसेच सहकारी संस्थांचे लेखापरिक्षण न होण्यामागची कारणे काय, याबाबत शासनाने अशा संस्थांच्या बाबतीत काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (२४-०६-२०२०) :** (१) अंशत: खरे आहे.

मुंबईमध्ये सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षाचे लेखापरिक्षणाचे एकूण २९,९१३ सहकारी संस्था लेखापरिक्षणास पात्र होत्या. त्यापैकी माहे फेब्रुवारी, २०१९ एकूण २२,८४० संस्थांचे लेखापरिक्षण झालेले असून ७०७३ संस्थांचे लेखापरिक्षण झालेले नाही.

(२) मुंबईमधील सन २०१७-२०१८ या वर्षाचे माहे मार्च, २०१९ अखेर एकूण २५१७४ सहकारी संस्थांचे लेखापरिक्षण पूर्ण झालेले असून, ४७३९ संस्थांचे लेखापरिक्षण झालेले नाही.

लेखापरिक्षण न झालेल्या संस्थांमध्ये प्रामुख्याने गृहनिर्माण संस्थांचा समावेश असून, लेखापरिक्षण न होण्यामागे संस्थांचे दत्पर अपूर्ण असणे, लेखापरिक्षकास लेखापरिक्षण करण्याकरिता प्रतिसाद न देणे, संबंधित लेखापरिक्षकाने लेखापरिक्षण न करणे इ. कारणे आहेत.

सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, पुणे या कार्यालयाने वेळोवेळी झालेल्या मासिक सभांमध्ये संबंधित निबंधकांना १००% संस्थाचे लेखापरिक्षण करण्यास सूचना दिलेल्या आहेत. तसेच, त्यांनी त्यांच्या दि.६/३/२०१९ रोजीच्या पत्रानुसार मुंबईमधील सर्व जिल्हा उपनिबंधक व जिल्हा विशेष लेखापरिक्षक यांना ज्या संस्थांचे लेखापरिक्षण झालेले नाही, त्या संस्थांचे अधिकारी, पदाधिकारी तसेच लेखापरिक्षक यांच्याविरुध्द

अधिनियमातील तरतुदींनुसार कारवाई करण्याबाबत सुचित केले आहे. त्यानुसार संबंधित निबंधकांनी सर्व संस्थांना नोटीस/सूचना दिलेल्या असून, काही संस्थांबाबत अधिनियमातील कलम १०२/१०३ अन्वये अवसायनाबाबत अंतरिम आदेश पारित केलेले आहेत. तसेच, काही संस्थांना कलम ७९(२) अन्वये निर्देश देण्यात आलेले आहेत. त्यानुसार लेखापरिक्षण न झालेल्या संस्था व लेखापरिक्षक यांच्याविरुध्द कारवाई करणे सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ च्या कलम ८५ नुसार कार्यवाही करण्याबाबत

**(२६) ४६९७० (०५-०७-२०१९). श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे : दिनांक २८ फेब्रुवारी, २०१९ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ७ मधील प्रश्न क्रमांक ४४९९८ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जमिनीचे वाटप करण्यासाठी महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ च्या कलम ८५ नुसार कार्यवाही करुन ती सुविधा जिल्ह्यातील शेतकऱ्यांना उपलब्ध करून द्यावी अशी मागणी पुर्णा (जि.परभणी) तालुक्यातील वकील संघाने उपविभागीय अधिकारी, गंगाखेड (जि.परभणी) यांच्याकडे सन २०१८ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कलम ८५ नुसार शेतकऱ्यांना वाटणी फेरबदल करण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी महसूल प्रशासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात (०६-०३-२०२०) :** (१) होय.
(२) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम ८५ नुसार शेतकऱ्याने धारण केलेल्या शेतजमिनीमध्ये एकाहून अधिक सहधारक असतील तर अशा, तसेच एकत्र हिंदु कुटुंबाच्या मालकीच्या धारण जमिनीतील आपल्या

हिश्याच्या/वाटणी विभाजनाकरिता जिल्हाधिकारी/तहसिलदार यांचेकडे अर्ज केल्यास, त्याप्रसंगी संबंधित सहधारकाकडे नोंदणीकृत वाटप-पत्राची मागणी करण्यात येऊ नये, अशा स्पष्ट सूचना शासन परिपत्रक क्र.जमीन ०७/२०१४/प्र.क्र.१३०/ज-१, दिनांक १६ जुलै, २०१४ अन्वये राज्यातील सर्व जिल्हाधिकारी, अपर जिल्हाधिकारी व तहसिलदार यांना देण्यात आल्या आहेत.

प्राप्त माहितीनुसार परभणी जिल्हयातील परभणी, सेलू, जिंतूर, पाथरी, मानवत, सोनपेठ, गंगाखेड, पूर्णा व पालम या तालुक्यातील कलम ८५ अंतर्गत जमीन वाटणीची एकूण ६४५ प्रकरणे दाखल झाली आहेत. त्यापैकी २४७ प्रकरणे निकाली काढण्यात आली असून, उर्वरित ३९८ प्रकरणांत कार्यवाही सुरू आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सातारा-बेंगलोर राष्ट्रीय महामार्गाचे सहापदरीकरणाचे काम पूर्ण करण्याबाबत

**(२७) ४७०३० (०५-०७-२०१९). श्री.आनंदराव पाटील, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, ॲड.रामहरी रुपनवर, डॉ.सुधीर तांबे, ॲड.हुस्नबानू खलिफे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.हरीसिंग राठोड : दिनांक ९ ऑगस्ट, २०१७ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ९ मधील प्रश्न क्रमांक २६७४४ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा-बेंगलोर राष्ट्रीय महामार्ग क्र. ४ च्या सातारा ते कागल दरम्यानचे सहा पदरीकरणाचे काम अनेक वर्षापासून रखडले असल्याने या महामार्गावर ४ वर्षात १७४ लोकांना आपला प्राण गमवावा लागला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू महामार्गाच्या सहा पदरीकरणाचे काम पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (३०-०१-२०२०) :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) व (३) सातारा-बेंगलोर राष्ट्रीय महामार्ग क्र. ४ च्या सातारा ते कागल दरम्यानचे सहापदरीकरणाचे काम केंद्र शासनाच्या भारतीय राष्ट्रीय राजामार्ग प्राधिकरणामार्फत हाती घेण्याचे नियोजन आहे. सदर सहापदरीकरणाची निविदा प्रक्रिया केंद्र शासनाच्या भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, नवी दिल्ली या कार्यालयामार्फत हाती घेण्यात आली होती. तथापि प्रशासकीय कारणास्तव सदर निविदा प्रक्रिया रद्द करण्यात आली असून सदयस्थितीमध्ये सन २०१९-२०२० च्या आर्थिक वर्षात विषयांकित प्रकल्पाची निविदा प्रक्रिया पूर्ण करण्याचे नियोजन असल्याचे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, कोल्हापूर यांनी कळविले आहे.

---

## राज्यात उद्योग उभारण्याबाबत

**(२८) ४७०५६ (०६-०७-२०१९). श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, ॲड.रामहरी रुपनवर, ॲड.हुस्नबानू खलिफे, श्री.आनंदराव पाटील, डॉ.सुधीर तांबे, आर्कि.अनंत गाडगीळ, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.हरिसिंग राठोड, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.मोहनराव कदम, प्रा.जोगेन्द्र कवाडे : तारांकित प्रश्न क्रमांक ४१७४४ ला दिनांक १० जुलै, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात उद्योजकांनी उद्योग उभारावेत यासाठी शासनाने मेक इन महाराष्ट्र, मॅग्नेटिक महाराष्ट्र हे उपक्रम हाती घेतले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या उपक्रमाच्या माध्यमातून गेल्या ४ वर्षात राज्यात किती उद्योग आले आहेत वा येत आहेत तसेच या उद्योगांच्या माध्यमातून किती जणांना रोजगार मिळाला वा मिळणार आहे,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार राज्यात मॅग्नेटिक महाराष्ट्र उपक्रम हाती घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (०४-०३-२०२०) :** (१), (२) व (३) महाराष्ट्र शासनामार्फत राज्यात औद्योगिक गुंतवणूक वाढावी तसेच उद्योग निर्मितीसाठी पोषक वातावरण तयार व्हावे यासाठी दि.१३ ते १८ फेब्रुवारी, २०१६ दरम्यान मेक इन इंडिया सप्ताह मुंबई येथे आयोजित करण्यात आला होता. तसेच मॅग्नेटिक महाराष्ट्र कन्व्हेजन्स-२०१८ या जागतिक गुंतवणूक परिषदेचे दि. १८/०२/२०१८ ते दि. २४/०२/२०१८ या कालावधीत आयोजन करण्यात आले होते. सदर दोन्ही कार्यक्रमांतर्गत करण्यात आलेले सामंजस्य करार प्रत्यक्ष साकारण्याच्या अनुषंगाने शासनस्तरावर वेळोवेळी आढावा बैठका घेवून प्रकल्पांची गुंतवणूक मूर्त स्वरुपात रुपांतरीत करणेसाठी राज्य शासनामार्फत भरीव प्रयत्न करण्यात येत आहेत.

मेक इन इंडिया २०१६ कार्यक्रमात उद्योग विभागामार्फत गुंतवणूक प्रस्तावांची सद्य:स्थिती खालीलप्रमाणे आहे :-

| | **प्रस्तावित** | **उद्योगांनी प्राथमिक टप्पे पूर्ण केलेले प्रस्ताव** |
|---|---|---|
| **एकूण सामंजस्य करार** | २८५० | २४६४ (८६.४६%) |
| **गुंतवणूक (रु.कोटी)** | ३९३००० | ३२९३४१(८३.८०%) |
| **रोजगार** | १३६५१०० | १३०२५४२(९५.४१%) |

तसेच फेब्रुवारी, २०१८ मध्ये मुंबई येथे आयोजित मॅग्नेटिक महाराष्ट्र कन्व्हेजन्स-२०१८ अंतर्गत करण्यात आलेल्या सामंजस्य करारांची सद्य:स्थिती खालीलप्रमाणे आहे :-

| | **प्रस्तावित** | **उद्योगांनी प्राथमिक टप्पे पूर्ण केलेले प्रस्ताव** |
|---|---|---|
| **एकूण गुंतवणूक प्रस्ताव** | ३८४२ | ३५१२ (९१.३९%) |
| **गुंतवणूक (र.कोटी)** | ५७५९५२ | ५५११३ (९.५७%) |
| **रोजगार** | ७१४४७१ | २७९६००(३९.१३%) |

मॅग्नेटिक महाराष्ट्र कन्व्हेजन्स-२०१८ मध्ये उद्योग विभागामार्फत करण्यात आलेल्या सामंजस्य करारांच्यापैकी प्राथमिक टप्पे पूर्ण केलेल्या प्रस्तावाच्या अंमलबजावणीची विगतवारी खालीलप्रमाणे आहे :-

| | **प्रस्तावित** | **गुंतवणूक (रु. कोटी)** | **रोजगार** |
|---|---|---|---|
| **उत्पादनात गेलेले घटक** | ७०१ | २५८७० | ४१६५७ |
| **बांधकाम सुरु असलेले घटक** | २९६ | ९०३८ | १०८७६७ |
| **प्राथमिक पाऊल उचलेले घटक** | २५१५ | २०२०५ | १२९१७६ |
| **एकूण** | **३५१२** | **५५११३** | **२७९६००** |

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## गोळेगांव (ता.औंढा नागनाथ, जि.हिंगोली) येथे बेकायदेशीरपणे शेळ्या मेंढ्यांची वाहतूक केल्याबाबत

**(२९) ४७१०२ (१०-०७-२०१९). श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोळेगांव (ता.औंढा नागनाथ, जि.हिंगोली) येथे बेकायदेशीरपणे क्रुरतेने शेळ्या मेंढ्यांची वाहतूक करणाऱ्या वाहनांना उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांनी पकडून सुमारे ३५ लाख रुपयांच्या शेळ्या मेंढ्यांसह ११ वाहने दिनांक १६ फेब्रुवारी, २०१९ रोजी वा त्यासुमारास जप्त केली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नूसार संबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख (१३-०२-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे.

श्री. अे.जी. खान, उपविभागीय पोलीस अधिकारी (हिंगोली ग्रामीण) हे त्यांच्या कर्मचाऱ्यासह दि.१६/०२/२०१९ रोजी पेट्रोलिंग करत असताना गोळेगाव शिवारात काळे पेट्रोल पंपजवळ ११ वाहनातून रु. ३४ लाख ५० हजार किंमतीच्या एकूण ११५० शेळया मेंढयाची वाहतूक केली जात असल्याचे आढळून आले.

(२) व (३) या प्रकरणी संबंधिताविरूध्द औढा नागनाथ पोलीस स्टेशनमध्ये दि.१६/०२/२०१९ रोजी गु.र.नं. १९/२०१९ अन्वये प्राण्यांचा छळ प्रतिबंधक अधिनियम कलम ११(१)(ड) व मोटार वाहन अधिनियम कलम १८३ व १७७ नुसार गुन्हा नोंदविण्यात आला आहे. सदर गुन्हयात ११ आरोपीना अटक करण्यात येऊन गुन्हयात वापरण्यात आलेली ११ वाहने व शेळ्या मेंढ्या जप्त करण्यात आल्या आहेत. मा.न्यायालयाच्या आदेशान्वये संबंधीत मालकास वाहने व शेळया मेंढया परत करण्यात आल्या आहेत. आरोपीविरूध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्याकरीता पुढील पोलीस तपास करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नागपूर विभागांतर्गत कामगार आयुक्त कार्यालयातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(३०) ४७२०१ (०६-०७-२०१९). श्री.रामदास आंबटकर, प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर विभागांतर्गत कामगार आयुक्त कार्यालय अधिनस्त वर्ग-१ व २ ची ७० पदे रिक्त असून सहाय्यक कामगार आयुक्ताची चार पदे रिक्त असल्याचे दिनांक ७ डिसेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (०४-०२-२०२०) :** (१) होय, अंशत: खरे आहे. नागपूर विभागांतर्गत वर्ग-१ संवर्गातील १० पदे मंजूर असून ५ पदे कार्यरत असून ५ पदे रिक्त आहेत. तसेच वर्ग २ ची २६ पदे मंजूर असून ९ पदे कार्यरत व १७ पदे रिक्त रिक्त आहेत.

(२) पदोन्नती कोट्यातील तसेच महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने शिफारस केलेल्या व नामनिर्देशनाने नियुक्त झालेल्या उमेद्‌वारामार्फत अपर कामगार आयुक्त, नागपूर विभागांतर्गत रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरू आहे तसेच रिक्त पदांचा अतिरिक्त कार्यभार अन्य अधिकाऱ्याकडे सोपविण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबईत बेकायदा पार्किंगच्या प्रमाणात वाढ झाल्याबाबत

**(३१) ४७२०८ (१२-०७-२०१९). श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, ॲड.रामहरी रुपनवर, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.सुधीर तांबे, ॲड.हुस्नबानू खलिफे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.हरिसिंग राठोड, श्री.मोहनराव कदम, श्री.आनंदराव पाटील, श्री.रमेशदादा पाटील, श्री.निलय नाईक, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील वाढत्या वाहन संख्येबरोबरच वाहतुकीशी संबंधित नियम न पाळणा-यांच्या संख्येत तसेच बेकायदा वाहन पार्किंग करणाऱ्यांच्या संख्येत वाढ झाल्यामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नवी मुंबईमध्ये ठाणे-बेलापूर हायवे लगतच्या रस्त्यांवर कंटेनर, टँकर, ट्रक, स्कुल बस आणि इतर खाजगी वाहनांचे अनधिकृतरित्या पार्किंग होत असल्याने वाहतूक कोंडी होत असल्याचे माहे मे, २०१९ च्या दुस-या सप्ताहात निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार वाहतुकीचे नियम न पाळणाऱ्या तसेच बेकायदा वाहन पार्कींग करणा-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख (१३-०२-२०२०) :** (१) हे अंशत: खरे आहे.

मुंबईतील वाढती लोकसंख्या व त्या प्रमाणात वाढलेली वाहनांची संख्या, तसेच पार्किंगकरीता अपुरी जागा त्यामुळे वाहतुकीसंबधीत नियम न पाळणाऱ्यांच्या संख्येत व बेकायदा वाहन पार्किंग करणाऱ्यांच्या संख्येत वाढ झाली आहे. त्यामुळे वाहतुकीस काही प्रमाणात अडथळा निर्माण झाला आहे.
(२) हे खरे नाही.

नवी मुंबई वाहतूक विभागाकडून ठाणे-बेलापूर रोडवर वाहतुकीस अडथळा होईल अशा स्थितीत अनधिकृतपणे पार्क केल्या जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनावर नियमितपणे कायदेशीर कारवाई करण्यात येत आहे. सदर मार्गावर आवश्यक मनुष्यबळ नेमण्यात आले असून वाहतूक सुरळीत राहील याबाबत दक्षता घेतली जात आहे.

(३) नवी मुंबई वाहतूक विभागाकडून ठाणे-बेलापूर रोडवर माहे जानेवारी, २०१९ ते सप्टेंबर, २०१९ पर्यंत मोटार वाहन अधिनियम कलम क्र.१२२ व १७७ अंतर्गत रोड पार्किंगसंबधी ८१४४ केसेस व मोटार वाहन अधिनियम कलम क्र. १७७ व रोड रेग्युलेशन रूल्स क्र. १५ अंतर्गत नो पार्किंगसंबधी १०७१६ केसेस दाखल करण्यात आल्या आहेत.

मुंबई शहरात वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहन चालकावर सन २०१६ ते जुलै, २०१९ या कालावधीत वाहतूक शाखेकडून ५८,३५,७५३ केसेस मध्ये रू. १४२,९६,०९,५५०/- इतका दंड वसूल करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## परभणी जिल्हयातील गोदावरी नदीपात्रातील पाण्याची समस्या सोडविण्याबाबत

**(३२) ४७२८२ (०५-०७-२०१९). श्री.विप्लव बाजोरिया :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्हयातील गोदावरी पात्र कोरडे पडल्यामुळे पशु-पक्षांसह स्थानिक ग्रामस्थांची पाण्याअभावी परवड होत असल्याचे माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गोदावरी नदीचा परिसरही दुष्काळाच्या छायेत सापडला असून ग्रामस्थांना पाण्याकरिता भटकंती करावी लागते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तद्नुसार गोदावरी नदीपात्रातील पाण्याची समस्या सोडविण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील (०८-११-२०१९) :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झालेल्या गावामध्ये टंचाई निवारणासाठी आवश्यक उपाययोजना घेण्यात आली.

(३) गोदावरी नदी परिसरातील ज्या गावांमध्ये पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झालेल्या गावामध्ये ५ टँकर, १८ खाजगी विहिर अधिग्रहण, ७ नळ योजनांची विशेष दुरुस्ती व १८ नविन विंधन विहिर घेऊन पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यात आलेला आहे.
(४) प्रश्नच उद्भवत नाही.

---

## परभणी महानगरपालिकेचा कारभार चालविण्यासाठी घेतलेल्या कर्जाची परतफेड नियमित होण्याबाबत

**(३३) ४७३०९ (१२-०७-२०१९). श्री.विप्लव बाजोरिया :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परभणी महानगरपालिकेचा कारभार चालविण्यासाठी घेतलेल्या कर्जाची परतफेड नियमित होत नसल्याने विविध विभागांच्या कर्जाचा आकडा १०० कोटी रुपयांवर पोहचला असल्याचे माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महापालिकेचे उत्पन्नाचे स्त्रोत उपलब्ध नसल्याने महापालिका आर्थिक संकटात सापडली असून महापालिकेचे मालमत्ता कर आणि नळपट्टी वसुलीकडे दुर्लक्ष होत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन महापालिकेवर असलेले कर्ज आणि उत्पन्नाचे स्त्रोत यांचा ताळमेळ करण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०२-०१-२०२०) :** (१) होय, अंशत: खरे आहे.

परभणी नगरपरिषद असताना पाणीपुरवठा योजनेसाठी सन १९७७ ते २०११ या कालावधीमध्ये नगरपरिषदेमध्ये एकूण रु.८० कोटी इतके कर्ज घेतले असून, महानगरपालिकेने सन २०१८-२०१९ मध्ये मुन्फ्रामार्फत रु.१४ कोटी कर्ज घेतलेले आहे. त्यानुसार सद्यस्थितीत महानगरपालिकेवर एकूण ९४ कोटी कर्ज असून, महानगरपालिका काळात घेतलेल्या कर्जाची परतफेड महानगरपालिकेकडून नियमित करण्यात येत आहे.
(२) व (३) सन २००५-२००६ पासून नियमाप्रमाणे परभणी शहरातील मालमत्तांची नविन कर आकारणी न होता, सन २०१६-२०१७, सन २०१७-२०१८ मध्ये महानगरपालिकांतर्गत सर्व मालमत्तांचे कर आकारणी योग्य मुल्यावर करण्यात आलेली आहे.

सध्या परभणी शहरास जुन्या योजनेंतर्गत पाणीपुरवठा करण्यात येतो. (सदर योजना शहरातील एक लक्ष लोकसंख्येकरीता आहे) नविन पाणीपुरवठा योजना प्रगतीपथावर असून, सदर योजना सुरु झाल्यानंतर पाणीपुरवठा कर वसुलीमध्ये वाढ होण्यास मदत होईल.

नविन कर आकारणी व इतर उत्पन्नांचे स्त्रोत निर्माण करण्याचे काम सुरु असून त्याव्दारे थकीत कर्जाची परतफेड करण्याचे प्रयोजन आहे, असे परभणी शहर महानगरपालिकेने कळविले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील खाजगी अनुदानित शाळेतील शिक्षकांना वेतन लागू करण्याबाबत

**(३४) ४७३८८ (०५-०७-२०१९). श्री.हरिसिंग राठोड, ॲड.हुस्नबानू खलिफे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, ॲड.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील खाजगी अनुदानित शाळेतील शिक्षकांसाठीचा शालेय शिक्षण विभागाचा शासन आदेश दिनांक २२ फेब्रुवारी, २०१९ रोजी जाहीर झाला असला तरी वेतन लगेच लागू होत नसल्याने त्यासाठी अनेक प्रशासकीय प्रक्रियांना सामोर जावे लागणार असल्याचे माहे मार्च, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वेतन निश्चितीला सुरुवात न झाल्यामुळे शिक्षकांमध्ये असंतोष निर्माण झाला असून यासंदर्भात त्यांनी विभागीय शिक्षण उपसंचालकांना त्वरीत कार्यवाही करण्याबाबतचे निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन खाजगी अनुदानित शाळेमधील शिक्षकांना वेतन लागू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती वर्षा गायकवाड (०७-०२-२०२०) :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे. त्याबाबत विभागीय शिक्षण उपसंचालक, नागपूर यांचेकडे निवेदन प्राप्त झाले आहे.

(३) त्यानुसार खाजगी अनुदानित शाळेमधील शिक्षकांच्या वेतननिश्चितीची कार्यवाही विनाविलंब करण्याबाबत शासन पत्र दि.०८/०८/२०१९, दि. ०७/१२/२०१९ व इतर पत्रान्वये वेळोवेळी सर्व संबंधितांना सूचना देण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अमरावती येथील तहसिलचे सेतु केंद्रात जादाची रक्कम घेतल्याबाबत

**(३५) ४७४४८ (३०-०१-२०१४). श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती येथील तहसिलचे सेतु केंद्र बंद असतानाही कामानिमित्त येणाऱ्याकडून जादाची रक्कम घेतल्याचा प्रकार माहे सप्टेंबर, २०१३ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार प्रकरणातील दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात (२०-०१-२०२०) :** (१) नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नागपूर येथील मध्यवर्ती कारागृहात साखळी बॉम्ब स्फोट प्रकरणातील आरोपीचा मृत्यू झाल्याबाबत

**(३६) ४७५५८ (०५-०७-२०१९). प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार, श्री.रामदास आंबटकर, श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर येथील मध्यवर्ती कारागृहात शिक्षा भोगत असलेला सन १९९३ रोजीच्या मुंबई साखळी बॉम्ब स्फोट प्रकरणातील आरोपी अब्दुल गणी तुर्क याचा कारागृहात मृत्यू झाल्याची घटना दिनांक २६ एप्रिल, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्‌नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख (१०-०२-२०२०) :** (१) होय, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर येथे सदर बंद्यावर औषधोपचार सुरु असतांना दि. २५/०४/२०१९ रोजी मृत्यू झाला आहे.
(२) सदर बंद्याचे मृत्यूबाबत वरिष्ठ पोलीस निरीक्षक, धंतोली पोलीस स्टेशन यांना अधीक्षक, नागपूर मध्यवर्ती कारागृह यांचे पत्र दि. २५/०४/२०१९ अन्वये कळविण्यात आलेले असून ए.डी.आर.क्र.२३/१९ अन्वये मृत्यूची नोंद घेण्यात आलेली आहे. सदर बंद्याचा सविस्तर मृत्यू अहवाल, शवविच्छेदन अहवाल, इनक्वेस्ट पंचनामा इ. अधीक्षक, नागपूर मध्यवर्ती कारागृह यांनी दि.

२६/०७/२०१९ रोजी मा.राष्ट्रीय मानवी हक्क आयोग, नवी दिल्ली यांना सादर केला आहे. तसेच दि.२५/०४/२०१९ रोजी सदर बंदी मृत्यू प्रकरणी कलम १७६ सी.आर.पी.सी. प्रमाणे न्यायदंडाधिकारी चौकशी करुन मा.राष्ट्रीय मानवी हक्क आयोग, नवी दिल्ली यांना अहवाल सादर करणेबाबत मा.मुख्य न्यायदंडाधिकारी, नागपूर यांना विनंती करण्यात आली आहे. मा.मुख्य न्यायदंडाधिकारी व जिल्हाधिकारी, नागपूर यांचा चौकशी अहवाल अद्याप अप्राप्त आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शासकीय वैद्यकीय रूग्णालय व इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय रूग्णालयात तपासणीसाठी विलंब होत असल्याबाबत

**(३७) ४७५७२ (१०-०७-२०१९). श्री.गिरीशचंद्र व्यास, प्रा.अनिल सोले, श्री.रामदास आंबटकर, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय वैद्यकीय रूग्णालय व इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय रूग्णालयात दररोज हजारो रूग्ण येत असून गेल्या काही दिवसांपासून अनेक विभागातील डॉक्टर रजेवर गेल्याने रूग्णांच्या तपासणीसाठी विलंब होत असल्याचे दिनांक २७ एप्रिल, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शासकीय वैद्यकीय रूग्णालयात १३५ च्या जवळपास डॉक्टर असून, यातील ६५ डॉक्टर रजेवर गेले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अमित विलासराव देशमुख (०३-०२-२०२०) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई उपनगरातील गोरेगांव-मुलुंड लिंक रोडचे काम सुरु करण्याबाबत

**(३८) ४७५८९ (१२-०७-२०१९). श्री.प्रविण दरेकर, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उपनगरातील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातून (नॅशनल पार्क) गोरेगांव-मुलुंड लिंक रोडचे काम येत्या आर्थिक वर्षात सुरु करण्याचा निर्णय मुंबई महापालिकेने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त रस्त्यांतर्गत बांधण्यात येणाऱ्या मुख्य बोगद्याची परवानगी मिळविण्यासह त्यांच्या निविदा काढण्याकरिता सल्लागाराची नियुक्ती केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर सल्लागाराकरिता किती खर्च करण्यात आला आहे तसेच मुंबई महानगरपालिकेकडे प्रमुख अभियंता व अन्य तज्ञ अभियंते असतांनाही खाजगी सल्लागारांची नियुक्ती करण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले तद्नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०७-०९-२०१९) :** (१) हे खरे आहे.

(२) सदर कामासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत सल्लागाराची नियुक्ती करण्यात आली आहे.

(३), (४) व (५) सदर कामाकरिता सल्लागाराची फी रु. २.२५ कोटी इतकी निश्चित करण्यात आली असून, त्यापैकी रु. १.५७५ कोटी इतकी रक्कम सल्लागारास अदा करण्यात आली आहे.

सदर कामाकरिता प्रस्तावित बोगदे पारंपारिक पध्दतीने भूसुरुंग न वापरता टी.बी.एम. (Tunnel Boaring Machine) तंत्रज्ञानाने करण्यात येणार आहे.

सदर बोगद्याचा व्यास १४.२ मीटर असून, अशा प्रकारच्या बोगद्याचा प्रकल्प भारतात पहिल्यांदाच राबविण्यात येत असल्याने सल्लागाराची नियुक्ती करण्यात आली आहे.

तसेच टी.बी.एम. तंत्रज्ञानामुळे संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील वनस्पती व प्राणी यांना हानी पोहोचण्याची शक्यता नसल्याने या तंत्रज्ञानाचा वापर करणार असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

---

## राज्यातील पोलीस कोठडीतील मृत्यू रोखण्याबाबत

**(३९) ४७८४६ (१०-०७-२०१९). श्री.शरद रणपिसे, ॲड.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव ठाकूर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यसभेत सादर केलेल्या एका अहवालानुसार देशात गत तीन वर्षात ४४२ जणांचा पोलीस कोठडीत मृत्यू झाला असल्याचे दिनांक ३१ जानेवारी, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यापैकी महाराष्ट्रात सर्वाधिक म्हणजेच ६८ जणांचा मृत्यू झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त अहवालाची दखल घेऊन शासनाने राज्यातील पोलीस कोठडीतील मृत्यू रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख (१७-०२-२०२०) :** (१) व (२) राज्यात गत तीन वर्षात एकूण ३८ जणांचा पोलीस कोठडीत “मृत्यू” झाल्याचे निदर्शनास आले आहे.

(३) पोलीस कोठडीतील पोलिसांच्या ताब्यातील आरोपींची देखभाल, पोलीस कोठडीमध्ये मृत्यूच्या/आत्महत्येच्या घटनांना प्रतिबंध करण्यासाठी आवश्यक उपाययोजना व घ्यावयाची दक्षता, तसेच पोलीस कोठडीमध्ये मृत्यू पावलेल्या कैदयांची प्रकरणे हाताळण्यासंदर्भात अवलंबावयाची कार्यपध्दती इत्यादी

संदर्भात शासन, पोलीस महासंचालक व अपर पोलीस महासंचालक, गु.अ.वि, पुणे यांच्याकडून वेळोवेळी परिपत्रकान्वये सविस्तर सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

(४) कार्यवाही करण्यास विलंब झालेला नाही.

---

## राज्यात पशुवैद्यकीय दवाखान्याची दुरुस्ती करण्याबाबत

**(४०) ४७८६९ (०५-०७-२०१९). श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात पशुवैद्यकीय दवाखान्याच्या अतिशय जीर्ण झालेल्या इमारती, अपुरी कर्मचारी संख्या यामुळे पशुपालनांची गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पशुंच्या १९ व्या गणनेनुसार पशुधन संख्येमध्ये वाढ झाली असूनही पशुवैद्यकीय कर्मचाऱ्यांची संख्या ही सन १९९९ च्या नुसारच आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन आवश्यक कर्मचारी पदे भरण्याबाबत तसेच, पशुवैद्यकीय दवाखान्याची दुरुस्ती करुन उत्तम सोयीचे दवाखाने उभारण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुनिल केदार (२०-०२-२०२०) :** (१), (२) व (३) राज्यातील ग्रामीण भागातील पशुवैद्यकीय दवाखाने श्रेणी-१ व २ पैकी काही संस्थांच्या इमारतीची दुरूस्ती करणे आवश्यक आहे. त्यासाठी जिल्हा परिषदेंतर्गत कार्यरत असलेल्या पशुवैद्यकीय दवाखान्याच्या इमारत दुरूस्तीसाठी संबंधित दवाखान्याव्दारे जमा झालेल्या सेवाशुल्क रकमेतून इमारत दुरूस्ती दिनांक ११/१०/२०१० च्या शासन निणर्यान्वये मान्यता देण्यात आलेली आहे. तसेच काही प्रमाण जिल्हा परिषदेकडून निधी उपलब्ध करुन घेण्याची कार्यवाही सुरू आहे. त्याचप्रमाणे राज्यस्तरावरील दवाखान्यासाठी शासनाकडील उपलब्ध निधीमधून इमारतीची दुरूस्ती करण्यात येत आहे. तसेच पशुपालकांना त्यांच्या घरी जावून सेवा पुरविली जात आहे.

रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरू असून, सध्या रिक्त पदांचा अतिरिक्त कार्यभार जवळच्या दवाखान्यामधील कर्मचाऱ्यांकडे सोपविण्यात आला आहे.

पशुसंवर्धन विभागाच्या पदांचा आढावा घेऊन नवीन सुधारीत आकृतिबंध निश्चित करण्याची कार्यवाही सुरू आहे.

पशुवैद्यकीय दवाखान्यांवरील सरळसेवेची रिक्त पदे सरळसेवेने आणि पदोन्नतीची पदे पदोन्नतीने भरण्याचे संकल्पीत असून, तसेच दवाखान्याच्या इमारती दुरूस्तीसाठी जिल्हा परिषद व राज्य शासनाकडून निधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबईत आंतरराष्ट्रीय दर्जाचे सर्व भाषिक ग्रंथालय उभारण्याबाबत

**(४१) ४७९५७ (१२-०७-२०१९). श्री.आनंदराव पाटील :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेने मुंबईत आंतरराष्ट्रीय दर्जाचे सर्व भाषिक ग्रंथालय उभारण्याचे ठरविले असल्याचे दिनांक ३ मार्च, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन ग्रंथालय उभारण्याच्या कामास सुरुवात करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०७-१२-२०१९) :** (१) हे खरे नाही असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(२) व (३) बृहन्मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ मधील कलम ६३(क) अन्वये स्थानिक नागरिकांना ग्रंथालयीन सुविधा उपलब्ध करुन देणे हे महानगरपालिकेचे स्वविवेकाधीन कर्तव्य आहे.

त्यानुसार महानगरपालिकेमार्फत बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रात एकूण ४२ सार्वजनिक ग्रंथालये व वाचनालये चालविण्यात येत आहेत.

त्यापैकी २९ सार्वजनिक मोफत ग्रंथालये व वाचनालये सन १९६५ पासून वार्षिक आवर्ती अनुदान देण्यासापेक्ष व्यवस्थापन व परिरक्षणाकरिता “मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय” या संस्थेस चालविण्याकरिता देण्यात आली आहेत.

उर्वरित ग्रंथालये/वाचनालये खाजगी संस्थांच्या सहकार्याने चालविण्यात येत आहेत.

त्याचप्रमाणे विकास नियंत्रण नियमावली १९९१ च्या तरतुदीनुसार सार्वजनिक ग्रंथालय/वाचनालय या सार्वजनिक उद्दिष्टांसाठी आरक्षित असलेल्या जागा विकासकाकडून महानगरपालिकेस प्राप्त झाल्या आहेत.

तसेच, महानगरपालिकेच्या ताब्यात असलेल्या ९ जागा सार्वजनिक वाचनालय/अभ्यासिका मार्गदर्शक तत्वानुसार चालविण्यास विविध संस्थांना देण्यात आले असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे.

---

## राज्यात पशुसंवर्धन विभागाने नियमबाहय पदोन्नती दिल्याबाबत

**(४२) ४७९८९ (०५-०७-२०१९). श्री.आनंदराव पाटील :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात पशुसंवर्धन विभागाने पशुसंवर्धन विकास अधिकारी गट-ब पदांच्या १२५ पदोन्नती नियमबाह्य केल्या असल्याचा आरोप नागपूर पशुवैद्यकिय महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी केल्याचे माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने नियमबाह्य पदोन्नती केल्याप्रकरणी संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुनिल केदार (१८-०२-२०२०) :** (१) व (२) अशा स्वरुपाची निवेदने प्राप्त झाली आहेत.

शासन आदेश क्र. पसंप्र-२०१३/प्र.क्र.३५८/(भाग-१)/पदुम-१, मंत्रालय, मुंबई-३२, दि.८/०३/२०१९ अन्वये राज्यस्तर व जिल्हा परिषद स्तरावरील १२५

सहाय्यक पशुधन विकास अधिकारी, गट-क यांना पशुधन विकास अधिकारी, गट-ब पदावरील पदोन्नतीचे आदेश नियमातील तरतुदीनुसार निर्गमित करण्यात आले आहेत.

सदर शासन आदेशास मूळ अर्ज क्र. २०४/२०१९ अन्वये महाराष्ट्र राज्य राजपत्रित पशुवैद्यक संघटनाद्वारा डॉ.संजय सदाशिवराव ठाकरे व इतर ३ यांनी मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, खंडपीठ नागपूर येथे आव्हान दिलेले असून प्रस्तुत प्रकरण सध्या न्यायप्रविष्ट आहे. तसेच दिनांक २०/०३/२०१९ रोजीच्या सुनावणीत मा.न्यायाधिकरणाने "जैसे-थे" Status quo असे निर्देश दिलेले आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात वाळूचा तुटवडा निर्माण झाल्याबाबत

**(४३) ४८०९६ (०५-०७-२०१९). श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.आनंदराव पाटील, ॲड.रामहरी रुपनवर, ॲड.हुस्नबानू खलिफे, डॉ.सुधीर तांबे, आर्कि.अनंत गाडगीळ, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.हरिसिंग राठोड, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.मोहनराव कदम, प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील वाळूचा तुटवडा वाढल्याने परदेशातून वाळूची आयात करण्याचा प्रस्ताव तसेच राखेपासून वाळू तयार करण्याचा प्रस्ताव माहे नोव्हेंबर, २०१८ पासून शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत निर्णय घेण्यात आला आहे काय, निर्णयाचे स्वरुप काय आहे व याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात (२८-०१-२०२०) :** (१), (२) व (३) परदेशातून वाळू आयात करण्यासंदर्भात नियमात तरतूद करण्याचा प्रस्ताव शासनाच्या

विचाराधीन आहे. तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाच्या क्र. संकीर्ण-२०१६/प्र.क्र.५०/यं.बां.सा., दिनांक २६ जुलै, २०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये कोळसा किंवा लिग्नाईटवर चालणाऱ्या औष्णिक विद्युत केंद्रापासून ३०० कि.मी. त्रिज्येच्या परिसरात बांधकाम करणाऱ्या अभिकरणाने इमारती बांधकामे करण्यासाठी फक्त औष्णिक विद्युत केंद्रातून निर्माण होणाऱ्या फ्लाय ॲश पासून बनविलेल्या उत्पादनांचा/साहित्याचाच वापर करणे अनिवार्य करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरील टोल वसूली बंद करण्याबाबत

**(४४) ४८०९७ (०५-०७-२०१९). श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.आनंदराव पाटील, ॲड.रामहरी रुपनवर, ॲड.हुस्नबानू खलिफे, डॉ.सुधीर तांबे, आर्कि.अनंत गाडगीळ, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.हरिसिंग राठोड, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.मोहनराव कदम, प्रा.जोगेन्द्र कवाडे : तारांकित प्रश्न क्रमांक ४४५११ ला दिनांक २६ नोव्हेंबर, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गाचे बांधकाम करण्यासाठी सुमारे रुपये २१०६ कोटी खर्च आलेला असून मे.म्हैसकर इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. या कंपनीला सदर महामार्गावरील पथकर वसूल करण्याचे कंत्राट दिल्यानंतर माहे ऑगस्ट, २००४ पर्यंत सुमारे रुपये ४३३० कोटी एवढी पथकर वसूली करणे अपेक्षित असताना सन २०१८ पर्यंत सुमारे रुपये ५७६३ कोटी रुपयांपेक्षा जास्त टोल वसूली कंपनीने केलेली असल्यामुळे कंपनीने सुमारे रुपये १४०० कोटी पेक्षा जास्त रक्कमेची टोल वसूली केलेली असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर महामार्गाच्या बांधकामासाठी झालेल्या रुपये २१०६ कोटी खर्चापेक्षा पथ करातून वसूल करण्यात आलेली रुपये ५७६३ कोटी ही रक्कम जास्त असतानाही माहे एप्रिल, २०३० पर्यंत पथकार वसूली सुरु ठेवणाचा व त्यात कोणत्याही वाहनांना सूट न देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने पथकर वसूलीत प्रवाशांची लूट होत रोखण्याकरीता मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरील टोल वसूली बंद करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (३१-०१-२०२०)** : (१) नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अमळनेर (जि.जळगांव) शहर बाह्यवळण रस्त्याच्या निर्मितीबाबत

**(४५) ४८२२० (०५-०७-२०१९). श्रीमती स्मिता वाघ : दिनांक २८ फेब्रुवारी, २०१९ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ४ मधील प्रश्न क्रमांक ४३८४७ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमळनेर (जि.जळगांव) येथे मेहेरगांव-धुळे-अमळनेर-चोपडा-खरगोन रस्ता रा.मा.१५ वरील अमळनेर शहरानजीक बाह्यवळण मार्गाची निर्मित होणेबाबत प्रस्ताव प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले असून सदर बाह्यवळण मार्गासाठी आवश्यक भूसंपादनासाठी निधी उपलब्ध नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर भूसंपादनासाठी निधी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अमळनेर यांचेमार्फत जिल्हाधिकारी, जळगाव यांचेकडे सन २०१२ मध्ये वर्ग करण्यात आला असून पूर्वीच्या भूसंपादन कायद्यानुसार सादर झालेला भूसंपादन प्रस्ताव व्यपगत झाला असल्याने भूमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ या नविन कायद्यानुसार भूसंपादनाचा प्रस्ताव फेरसादर करण्याची सुरु असलेली कार्यवाही पूर्ण झाली आहे काय, याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर बाह्यवळण मार्ग निर्मिती होणेबाबत तसेच आवश्यक निधी उपलब्ध होणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण (३१-०१-२०२०) :** (१) होय, अंशत: खरे आहे.

(२) होय, जिल्हाधिकारी जळगांव यांचेकडे भूसंपादनासाठीचा रु. १३४.२५ लक्ष निधी सन २०१२ मध्ये वर्ग करण्यात आला आहे. भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करतांना वाजवी भरपाई पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ नुसार प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## महाराष्ट्र सुरक्षा बलातील जवानाचे मानधन कमी असल्याबाबत

**(४६) ४८३३५ (१०-०७-२०१९). श्रीमती स्मिता वाघ :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र सुरक्षा बलातील जवानाचे मानधन कमी असल्याचे माहे मार्च, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जवानांचे मानधन वाढविण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे काय, त्याबाबत शासनाची भूमिका काय आहे व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख (१२-०२-२०२०) :** (१) हे खरे नाही.

(२) महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाने सन २०१२ ते सन २०१९ पर्यंत सुरक्षा रक्षकांच्या मानधनात वेळोवेळी वाढ करण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुसद (जि.यवतमाळ) येथील शहरी भागात वाहतूक कोंडी होत असल्याबाबत

**(४७) ४८५४२ (१०-०७-२०१९). डॉ.वजाहत मिर्झा, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.आनंदराव ठाकूर, ॲड.रामहरी रुपनवर, ॲड.हुस्नबानू खलिफे, डॉ.सुधीर तांबे, आर्कि.अनंत गाडगीळ :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुसद (जि.यवतमाळ) येथील शहरी भागात बेशिस्त वाहन चालकांमुळे वाहतूक कोंडी होत असल्याची बाब माहे एप्रिल, २०१९ च्या दुसऱ्या सप्ताहात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार पुसद शहरातील वाहतूक कोंडी सोडविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल देशमुख (१३-०२-२०२०) :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

पुसद शहरात वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या बेशिस्त वाहन चालकांविरूध्द मोटार वाहन कायद्यान्वये कारवाई करण्यात येत आहे. पुसद शहरातील वाहन पार्किंगची समस्या सोडविण्याकरीता नगरपरिषदेशी पत्रव्यवहार करून विठाळा वार्ड, आंबेडकर वार्ड, गांधी चौक, आझाद चौक या ठिकाणी वाहन पार्किंगची व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच वाहतुकीची कोंडी टाळण्यासाठी शहरातील मुख्य वर्दळीच्या ठिकाणी शिवाजी चौक, महात्मा फुले चौक, गांधी चौक येथे ट्रॉफीक सिग्नल बसविण्यात आले आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मौजे धोवली आदिवासी पाडा (ता.वसई, जि.पालघर) येथील महसूल खात्याच्या जागेवर अनधिकृत बांधकाम केल्याबाबत

**(४८) ४९०७४ (१२-०७-२०१९). श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे धोवली आदिवासी पाडा (ता.वसई, जि.पालघर) येथील सर्व्हे नं.१०४ हिस्सा नं.१/अ तसेच सर्व्हे नं.१६२, हिस्सा नं.१/ब या महसूल खात्याच्या जागेवर स्थानिक विकासकाने अनधिकृत बांधकाम केले असल्याचे माहे मे, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त बांधकाम स्थानिक महसूल विभाग व महापालिकेने जमीनदोस्त केले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले तद्नुसार सदर अनधिकृत बांधकाम निष्कासित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात (११-०३-२०२०) :** (१), (२) व (३) मौजे धोवली (आदिवासीपाडा), ता.वसई, जि.पालघर येथील स.नं.१०४/१/अ क्षेत्र ११-५६.० हे. आर जमीन गा.न.नं.७/१२ सदरी विनआकारी खांजण अशी नोंद आहे. मात्र स.नं. १६२, हिस्सा नं. १/ब ही मिळकत मौजे धोवली या गावी आढळून येत नाही. उक्त जमिनीवरील अनधिकृत बांधकाम निष्कासनाची कारवाई करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी उपविभागीय अधिकारी, वसई तसेच तहसिलदार, वसई यांचेकडे दिनांक २०/०५/२०१९ च्या पत्रान्वये तक्रार दाखल केली होती. सदर तक्रारीच्या अनुषंगाने तपासणी केली असता, सदर जमिनीवर श्री.रामचंद्र पुरुषोत्तम धोडी व श्री.श्याम तिवारी यांनी अनधिकृत बांधकाम केले असल्याचे निदर्शनास आले होते. सदर अनधिकृत बांधकामे मंडळ अधिकारी, माणिकपूर, वसई विरार महानगरपालिका व महाराष्ट्र राज्य विद्युत महामंडळ यांचे संयुक्त पथकाने दिनांक २२/११/२०१९ रोजी निष्कासित केली आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मानेगांव (ता.जळगाव-जामोद, जि.बुलढाणा) येथील जमीन प्रकरणी शेतकऱ्यांना न्याय देण्याबाबत

**(४९) ४९१३६ (०५-०७-२०१९). श्रीमती विद्या चव्हाण : तारांकित प्रश्न क्रमांक ३१०२२ ला दिनांक ७ ऑगस्ट, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे मानेगांव (ता.जळगांव-जामोद, जि.बुलढाणा) येथील गट नं. ३६, ३५२ व ३५९ ही जमीन सन १९४९ मध्ये मध्य प्रदेश भूसंहितानुसार तहसिलदार यांच्या आदेशानुसार ५५ (१) सी नुसार कै.दौलत संपत कारोडे (पाटील) यांना ही जमीन मालकी हक्काने मिळालेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रश्न भाग १ च्या अनुषंगाने शासनाच्या भूमिस्वामी कायद्याखाली दिनांक २ जानेवारी, २०१२ चा शासन निर्णय तसेच दिनांक २१ एप्रिल, २०१८ रोजीचा अध्यादेश तसेच विधिमंडळात ठराव पारित करुन त्या काळच्या जमिनी विनामूल्य मालकी हक्काने देण्याचे शासनाने जाहीर केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) च्या संदर्भात शेतजमिनीचे प्रकरण त्वरित निकालात काढणेबाबत मा.महसूल मंत्री, मा.महसूल राज्यमंत्री, मुख्य सचिव, प्रधान सचिव, महसूल विभाग व जिल्हाधिकारी (बुलढाणा) यांना लेखी पत्राव्दारे दिनांक २ मार्च, २०१९ रोजी लोकप्रतिनिधींनी लेखी निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने तक्रारकर्त्यास न्याय मिळवून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. बाळासाहेब थोरात (१५-०२-२०२०) :** (१) हे खरे नाही. मौजे मानेगाव, ता.जळगाव-जामोद येथील गट नं. ३६, ३५२ व ३५९ मधील जमीन शासकीय आहे.

(२) महसूल व वन विभाग, शासन परिपत्रक, दि.०२/०१/२०१२ अन्वये विदर्भातील अनिर्बंधीत भूमिधारी (भोगवटदार वर्ग-२) शेतक-यांना भूमीस्वामी (भोगवटदार वर्ग-१) मध्ये परावर्तीत करण्याबाबत निर्देश दिलेले आहेत. तसेच विदर्भातील ज्या जमिनी तत्कालीन मध्यप्रदेश भू-राजस्व संहिता, १९५४ अंतर्गत भूमिधारी अथवा हस्तांतरणाच्या निर्बंधासह भूमिस्वामी हक्काने वाटप करण्यात आल्या आहेत अशा जमिनी सन २०१८ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ९, दि. २१/०४/२०१८ अन्वये भोगवटदार वर्ग १ मध्ये रुपांतरण करण्याची तरतूद करण्यात आलेली आहे.

(३), (४) व (५) लोकप्रतिनिधींनी मा.मंत्री (महसूल), मा.राज्यमंत्री (महसूल), मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, प्रधान सचिव (महसूल) व जिल्हाधिकारी, बुलढाणा यांना दि. ०२/०३/२०१९ च्या पत्रान्वये निवेदन दिले आहे. विषयांकित निवेदनाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, बुलढाणा यांच्या कार्यालयाकडून वस्तुस्थितीदर्शक अहवाल मागविण्यात आला असून सदर अहवाल प्राप्त झाल्यावर नियमानुसार उचित कार्यवाही करण्याचे संकल्पित आहे.

---

## कौसा-मुंब्रा (जि.ठाणे) सैनिक नगर येथे असलेल्या पॅरेडाइन व ज्युनियर कॉलेजची इमारत धोकादायक झाल्याबाबत

**(५०) ४९३२८ (२३-०८-२०१९). श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्हयातील कौसा-मुंब्रा भागातील सैनिक नगर येथे असलेल्या पॅरेडाइन व ज्युनियर कॉलेजची इमारत ठाणे महानगरपालिकेमार्फत दिनांक २७ जुलै २०१८ रोजी अतिधोकादायक ठरविण्यात येवून शाळेला नोटीस पाठविण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ठाणे महानगरपालिकेने पाठविलेल्या नोटीसाची शाळेच्या व्यवस्थापनाने दखल घेतली नसल्याने विद्यार्थ्यांच्या जिवाला धोका निर्माण होऊन असुरक्षितता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू शाळेची दुरुस्ती करुन शाळेच्या व्यवस्थापनावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उध्दव ठाकरे (१४-०३-२०२०)** : (१), (२) व (३) ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील कौसा-मुंब्रा भागातील सैनिक नगर येथे असलेल्या पॅरेडाइन व ज्युनियर कॉलेजच्या इमारतीची सद्य:स्थिती खालीलप्रमाणे आहे :-

- ठाणे महानगरपालिकेच्या संबंधित अधिकारी/ कर्मचाऱ्यांनी सदर इमारतीची पाहणी करून दिनांक १२/०७/२०१८ रोजी इमारत धोकादायक घोषित केली.
- सदर इमारत सी-१ प्रवर्गातील असल्याचे घोषित करून सदर इमारतीला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २६४ अन्वये दिनांक १२/०७/२०१८ रोजी नोटीस बजावण्यात आली.
- उपरोक्त नोटीसीच्या अनुषंगाने शाळा प्रशासनाने दखल न घेतल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २६८(५) नुसार सदर इमारत रिक्त करणेकरिता पोलीस विभागास निर्देश देण्यात येऊन दिनांक २८/०८/२०१९ रोजी इमारत सीलबंद करण्यात आली आहे. तसेच इमारतीचा पाणी पुरवठा व वीज पुरवठा खंडित करण्यात आलेला आहे.
- सदर इमारतीचा वापर बंद असून शाळा अन्य इमारतीमध्ये भरविण्यात येत आहे. सदर इमारतीचा समावेश सी-१ प्रवर्गात केलेला असल्याने ठाणे महानगरपालिकेने सदर इमारत सील केलेली आहे.
- तथापि, शाळा व्यवस्थापनाने ठाणे महानगरपालिकाविरुध्द मा.ठाणे सत्र न्यायालय येथे सिव्हिल सुट क्र.१६३/२०१९ दावा दाखल केला असुन मा.न्यायालयाने अंतरिम आदेश पारित केलेले आहेत.

- सदर आदेशानुसार संबंधितांनी ठाणे महानगरपालिकेकडील दिनांक १९/०६/२०१३ मधील अटी व शर्तीनुसार इमारत/घरांचा तत्कालिन ग्रामपंचायत नकाशा, इमारत मंजुरीचे नकाशे, ॲसेसमेंट रेकॉर्ड, संबंधित वास्तुविशारद यांनी प्रमाणित केलेले नकाशे, इ. अटी व शर्तीसह रितसर अर्ज ठाणे महानगरपालिकेकडे सादर केलेला नाही.
- मा.न्यायालयाने दिलेल्या वरील अंतरिम आदेशाचे विरुध्द् ठाणे महानगरपालिकेने अपिल क्र.१७९/२०१९ दाखल केले असून सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.
- तथापि, ठाणे महानगरपालिकेने कायदेशीर बाबींची तपासणी करून इमारत रिक्त करून तोडण्याची कार्यवाही करण्याची तजविज ठेवली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**श्री. राजेंद्र भागवत**
**सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आले आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.